१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, बुधवार ८ जुलै, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१२५, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 125 Marathi - Daily - Mumbai, 8 July, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in

Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

पावसाचा 'रेड अलर्ट' आणखी किती दिवस?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# शरद पवार यांचे पुन्हा धक्कादायक राजकारण

## नऊ खासदारांना घेऊन भाजपासोबत जाणार?

■ मुंबई



**भाजपाने लोकसभा व राज्यसभेत पाशवी बहुमत असावे यासाठी फोडाफोडीची सीमा पार केली आहे. उबाठाचे खासदार फोडल्यानंतर आता शरद पवार गटाचे सर्वच्या सर्व नऊ खासदारांना आपल्यासोबत घेण्याचे जाळे टाकले आहे. हे खासदार भाजपात जातील किंवा भाजपाला पाठिंबा जाहीर करतील. शरद पवार आपले पत्ते शेवटच्या क्षणापर्यंत कधीच उघड करीत नाहीत, पण यावेळी त्यांच्या सहकारी काँग्रेस पक्षाचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी आजच सांगितले की, होय याची चर्चा सुरू आहे. महाराष्ट्राला सत्ता व संपत्तीच्या लालसेपोटी होणाऱ्या भूकंपांची आता सवय करण्याची वेळ आली आहे.**

**'ऑपरेशन टायगर'मुळे** महाराष्ट्राच्या राजकारणात उडालेली खळबळ शांत होत नाही तोच महाराष्ट्रात आणखी एक राजकीय भूकंप होणार असल्याची जोरात चर्चा होत आहे. शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील आणि भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यात मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये गुप्त बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष भाजपाच्या नेतृत्वातील एनडीएत सहभागी होण्यासंदर्भात चर्चा झाल्याचे बोलले जात आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी, अशी चर्चा सुरू असल्याचा दावा केला आहे. विशेष म्हणजे, शरद पवार गट काँग्रेसमध्ये विलिन होणार अशी चर्चाही गेले काही दिवस सुरू आहे. ती मुद्दाम सुरू ठेवली आहे का, असा संशय आता येत आहे. शरद पवार गट एनडीएत सामील झाल्यास आजवर अनेकदा उलटसुलट राजकीय भूमिका घेणाऱ्या शरद पवार यांच्या धक्कादायक राजकारणाचा आणखी एक अध्याय पाहायला मिळणार आहे.

सत्तेत नसल्यामुळे मतदारसंघातील विकासकामे करता येत नाहीत, अशी तक्रार असलेले शरद पवार गटाचे काही खासदार आणि आमदार थेट 'एनडीए'मध्ये जाण्यास उत्सुक असल्याच्या चर्चा गेले काही दिवस सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर, जयंत पाटील आणि विनोद तावडे यांच्यातील गुप्त बैठक महत्त्वाची मानली जात आहे. भाजपाला संसदेत मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करायचे आहे. यासाठी दोन तृतियांश बहुमताची गरज असल्याने ३१९ खासदार असलेल्या एनडीएला अधिकाधिक खासदार आपल्या गोटात हवे आहेत. शरद पवार गटाकडे लोकसभेचे ८ खासदार आणि राज्यसभेचा १ खासदार (स्वतः शरद पवार) आहेत. शरद पवार यांचा गट एनडीएत आल्यास दोन तृतियांश खासदार मिळवण्याच्या दृष्टीने त्यांची वाट सोपी होईल, असे गणित या 'ऑपरेशन तुतारी'मागे आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जयंत पाटील-बैठकीत शरद पवार जर एनडीएमध्ये अधिकृतपणे सहभागी झाला, तर त्यांच्या वाट्याला सत्तेत नेमके काय येऊ शकते, यावर दोन्ही नेत्यांमध्ये सविस्तर बोलणे झाले. महायुतीत थेट सामील न होता केवळ बाहेरून पाठिंबा देण्याच्या पर्यायावरही तावडे आणि पाटील यांच्यात चाचपणी झाली. तावडे यांच्याशी झालेल्या या दीर्घ चर्चेनंतर जयंत पाटील यांनी आपल्या पक्षाच्या इतर ज्येष्ठ नेत्यांशीही संपर्क साधून पुढील रणनीतीबाबत संवाद साधल्याची माहिती आहे.

काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी » पान ७ वर

### शरद पवार-फडणवीस यांची आज विधान भवनात बैठक

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या आगामी सुनावणीच्या पार्श्वभूमीवर उद्या विधान भवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची बैठक होणार आहे. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील वरिष्ठ नेते, तज्ज्ञ तसेच मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. सर्वोच्च न्यायालयातील लढ्याची पुढील रणनीती, कायदेशीर बाजू अधिक भक्कम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि सीमाप्रश्नी राज्याची भूमिका यावर या बैठकीत सविस्तर चर्चा होणार असल्याची माहिती आहे. मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीने गेल्या अनेक महिन्यांपासून उच्चाधिकार समितीची बैठक बोलावण्याची मागणी केली होती. त्यानुसार ३० जून रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, प्रशासकीय कारणांमुळे ती पुढे ढकलण्यात आली होती.

# लाडक्या बहिणींना रक्कम वाढवून देणार



■ नवी दिल्ली

**महायुती** सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची रक्कम वाढवा, अशी शिफारस पंतप्रधान आर्थिक सल्लागार परिषदेने केली आहे. महागाई आणि बदलत्या गरजांनुसार फेरआढावा घेऊन महिलांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीत आवश्यक वाढ करावी, असे मत परिषदेने मांडले आहे. त्यामुळे लाडकी बहिणीच्या १,५०० रुपयांच्या रकमेत वाढ होण्याची शक्यता आहे.

लाडकी बहीण योजनेअंतर्गत सरकारकडून राज्यातील पात्र महिलांना सध्या दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. विधानसभा निवडणुकीपूर्वी या रकमेत वाढ करण्याचे आश्वासन महायुतीकडून देण्यात आले होते. पण » पान ७ वर

### रक्षाबंधनानिमित्त दिल्लीत महिलांना दरमहा २,५०० रुपये

रक्षाबंधनानिमित्त दिल्ली सरकारने महिलांना लाडकी बहीण योजना भेट देण्याची तयारी केली आहे. 'महिला समृद्धी योजना' अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल पात्र महिलांना दरमहा २,५०० रुपये थेट बँक खात्यात जमा केले जाणार आहेत. २८ ऑगस्ट रोजी या योजनेचा शुभारंभ होण्याची शक्यता असून, सुमारे २० ते २२ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळण्याचा अंदाज आहे. योजनेसाठी ऑनलाईन नोंदणी पोर्टल आणि पात्रतेचे निकष तयार करून अधिकृत घोषणा केली जाणार आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाने » पान ७ वर

# राम मंदिर ट्रस्टच्या हिशेबाचा तपास

## समारंभांवर १२४ कोटी खर्च

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ अयोध्या

**श्रीराम** जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टमधील देणगी गैरव्यवहार प्रकरणाच्या तपासादरम्यान ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांचीही एसआयटीकडून तपासणी सुरू झाली आहे. गेल्या दोन वर्षांत मंदिरातील विविध धार्मिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांवर १२४ कोटी रुपये खर्च केले. या खर्चाचे ऑडिट आणि पडताळणी करण्यात येत आहे.

बिले, व्हाऊचर, मंजुरी प्रक्रिया आणि खर्चाच्या नोंदींची तपासणी करून ट्रस्टच्या आर्थिक नियमांचे पालन झाले का, याची खातरजमा केली जात आहे. अद्याप कोणत्याही आर्थिक गैरव्यवहाराचा निष्कर्ष काढलेला नाही. सनदी



लेखापालांच्या नोंदी आणि मंजुरीसंबंधी कागदपत्रांचीही तपासणी होत आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावर सुमारे ११३ कोटी रुपये खर्च केला गेला. देशभरातील सुमारे आठ हजार मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या ऐतिहासिक सोहळ्यासाठी शेड आणि टेंट सिटी उभारणीवर ३५.९७ कोटी रुपये, अक्षत पूजन अभियानावर ३०.८५ कोटी रुपये, प्रसिद्धी आणि जाहिरातींवर २१.७७ कोटी रुपये, तर सजावट आणि रोषणाईवर १४.६२ कोटी रुपये खर्च केल्याची नोंद आहे. याशिवाय अन्नक्षेत्र, धार्मिक विधी, ध्वनी व्यवस्था, वीज व्यवस्था, रांग सेवा आणि इतर तयारीवरही कोट्यवधी रुपयांचा खर्च केला होता.

# वसईकर पुराच्या पाण्यात अडकले

## ४० तास वीज-पिण्याचे पाणी नाही

■ वसई

**मुसळधार** पावसामुळे जलमय झालेल्या वसई-विरार शहरातील नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. शहरातील अनेक भागांत गेल्या ४० तासांहून अधिक काळ वीजपुरवठा खंडित असून मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट सेवाही बंद पडल्या आहेत. नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून ते जीवनावश्यक वस्तूंपर्यंत अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. दरम्यान, शहरातील बहुतांश भागांतील पाणी अद्याप ओसरले नसल्याने आता दुर्गंधी पसरू लागली असून, साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. पालघर जिल्ह्यातील शाळा, कॉलेजना उद्याही सुट्टी देण्यात आली आहे.

सततच्या पावसामुळे शहरातील अनेक » पान ७ वर

### नेटवर्कही ठप्प



# नाशिकवरील ढगफुटीचे संकट टळले

## ढग पालघरमार्गे सुरतच्या दिशेने गेले

त्र्यंबकेश्वरमध्ये आज ढगफुटी होण्याचा इशारा काल हवामान खात्याकडून देण्यात आला होता. परंतु ढगफुटीचे ढग अहिल्यानगर आणि पालघरमार्गे सुरतच्या दिशेने गेल्याने हे संकट टळले. मात्र, भूस्खलन होऊ शकते, पर्यटन करू नका, असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले. दरम्यान, राज्यात आजही सुरु असलेल्या संततधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली. ९ जुलैपासून पाऊस विश्रांती घेणार आहे.

ढगफुटीच्या इशाऱ्यामुळे सप्तशृंगी आणि त्र्यंबकेश्वर मंदिर परिसर सुरक्षेच्या कारणास्तव बंद ठेवण्यात आले होते. रामकुंड परिसरात मनपाचे सुरक्षारक्षक आणि पोलीस तैनात करण्यात आले होते. धबधबे, धरणे आणि किल्लेही ४८ तासांसाठी प्रतिबंधित करण्यात आले होते. ढगफुटी झाली नसली तरी आज मुसळधार पाऊस झाल्याने गोदावरी नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली. रामकुंडावरील दुतोंड्या मारुतीच्या गुडघ्यापर्यंत पुराचे पाणी पोहोचले. इगतपुरीमध्ये सर्वाधिक २०० मिमी पावसाची नोंद झाली, तर त्र्यंबकेश्वरमध्ये १२५ मिमी, सुरगाण्यात १४९ मिमी, सिन्नरमध्ये ७४ मिमी, पेठमध्ये ६१ मिमी, दिंडोरीत ५८ मिमी, पिंपळगावमध्ये २१ मिमी आणि देवळ्यात » पान ७ वर

# टीईटी सक्तीविरोधात ९ जुलैला

## राज्यव्यापी शाळाबंद आंदोलन

■ मुंबई

**राज्यातील** शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विविध शिक्षक संघटनांनी गुरुवार, ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळाबंद आंदोलनाची हाक दिली आहे. टीईटी पात्रतेची सक्ती, पदोन्नती प्रक्रियेतील नवीन अटी आणि शिक्षकांवर सोपविण्यात आलेल्या अशैक्षणिक कामांविरोधात हे आंदोलन करण्यात येणार आहे.

राज्यातील शिक्षकांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून दिली जाणारी कामे, विशेष मतदारयादी फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेतील नियुक्ती तसेच पदोन्नती प्रक्रियेतील बदल याबाबत शिक्षक संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील विविध संघटनांनी एकत्र येत आंदोलनाचा निर्णय घेतला आहे.

शिक्षक संघटनांच्या प्रमुख मागण्यांमध्ये कार्यरत शिक्षकांसाठी टीईटी पात्रतेची सक्ती स्थगित करणे, १४ मे रोजी जारी करण्यात आलेला पदोन्नतीसंदर्भातील आदेश मागे घेणे, विशेष मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेतील शिक्षकांची नियुक्ती रद्द करणे आणि सेवाज्येष्ठतेनुसार पात्र शिक्षकांना तातडीने पदोन्नती देणे यांचा समावेश आहे.



# तुकाराम महाराजांच्या पालखीचे

## भरपावसातही उत्साहात प्रस्थान

■ पुणे

**आषाढी** वारी महोत्सवासाठी संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे आज देहू येथून उत्साहात प्रस्थान झाले. मुसळधार पावसामुळे सोहळ्याच्या तयारीवर काही मर्यादा आल्या असल्या तरी ग्रामस्थ आणि वारकऱ्यांचा उत्साह कायम राहिला.

यंदाच्या वारीसाठी नवीन रथाची निर्मिती करण्यात आली असून, भरपावसात त्याची मिरवणूक काढण्यात आली. मंदिर परिसरात फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. इंद्रायणी नदीला पूर आल्याने नदीकाठावर बॅरिकेडिंग करण्यात आले. दरम्यान, संत ज्ञानेश्वर महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या श्रीक्षेत्र आपेगाव येथूनही संत ज्ञानेश्वर माऊलींची दिंडी आणि रथसोहळा पंढरपुरच्या आषाढी वारीसाठी रवाना झाला. मोठ्या भक्तिभावाच्या वातावरणात या सोहळ्याला प्रारंभ झाला.

आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे उद्या प्रस्थान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर नवीन रथ अर्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, मुसळधार पावसामुळे हा कार्यक्रम स्थगित करण्यात आला. तसेच प्रस्थान सोहळाही मर्यादित स्वरूपात होणार असून वारकरी, मानकरी, ग्रामस्थ, पोलीस आणि संबंधित यंत्रणांतील एकूण १६६० जणांनाच मंदिरात प्रवेश दिला जाणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी २४ जुलै रोजी पंढरपूर येथे दाखल होणार आहे.

# अभियंत्यांचे निलंबन तत्काळ रद्द करा

## 'इंजिनिअर्स असोसिएशन'ची मागणी

■ मुंबई

**मुंबईतील** गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे दोन भिन्न घटनांमध्ये दोन जणांचा बळी गेला. याला जबाबदार धरत मुंबई पालिका प्रशासनाने चार अभियंत्यांना निलंबित केले. हे निलंबन रद्द करण्याची मागणी करत म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशनने (एमईयू) काल पालिकेच्या एम-पूर्व प्रभाग कार्यालयाच्या आवारात जोरदार निदर्शने केली. अभियंत्यांचे निलंबन मागे न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा याप्रसंगी एमईयूच्या वतीने देण्यात आला.

जोपर्यंत या घटनांची सखोल चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत अभियंत्यांवर कोणतीही कारवाई केली जाऊ नये, असा एमईयूचा आग्रह आहे. यासंबंधी एमईयूच्या पदाधिकाऱ्यांनी पालिका प्रशासनाशी सविस्तर चर्चा केली. चौकशी पूर्ण होऊन अहवाल येईपर्यंत यापुढे अभियंत्यांवर कोणतीही कारवाई केली जाणार नाही, अशी ग्वाही प्रशासनाने दिल्यामुळे एमईयूने आधी घोषित केलेले आंदोलन पुढे ढकलले आहे. गेल्या आठवड्यात मुंबईच्या पूर्व उपनगरांतील चेंबूर येथे स्कूल बसवर झाड कोसळून झालेल्या अपघातात विहान श्रीवास्तव या ११ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. या घटनेला जबाबदार धरत प्रशासनाने ३ अभियंत्यांना निलंबित केले. दोन जुलै रोजी घडलेल्या दुसऱ्या घटनेत एका ५५ वर्षीय व्यक्तीचा उघड्या मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला.

# सिया-चेतनचा ४ महिन्यांपूर्वीच गुप्त विवाह

**लोहगड किल्ल्यावर केतन अग्रवालच्या हत्या प्रकरणाच्या तपासातून धक्कादायक माहिती मिळाली आहे. मुख्य आरोपी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांनी सुमारे चार महिन्यांपूर्वीच गुप्तपणे विवाह केल्याचे व्हॉट्सअॅप चॅट आणि अन्य तांत्रिक पुराव्यांतून उघड झाल्याचा दावा पोलिसांनी केला. केतन अगरवाल यांच्या हत्येचा कट रचण्याबाबत दोघांमध्ये संवादही झाला होता, असेही तपासात आढळले आहे. सध्या या दोघांना १६ जुलैपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.**

## व्हॉट्सअॅप चॅटमधून खुलासा

■ पुणे

**पोलिसांनी** तपासात सिया आणि चेतन यांच्या गेल्या सहा ते आठ महिन्यांतील व्हॉट्सअॅप



चॅट, कॉल रेकॉर्ड, लोकेशन आणि इंटरनेट हिस्ट्रीची छाननी केली आहे. यातून दोघांनी घरच्यांच्या विरोधामुळे सुमारे चार महिन्यांपूर्वी गुप्तपणे विवाह केल्याची माहिती मिळाली आहे. सिया आणि चेतन यांनी स्थानिक विवाह निबंधक कार्यालयात विवाह नोंदणी केल्याचाही संशय असून, त्या नोंदणीचे प्रमाणपत्र अस्तित्वात आहे का, याची तपासणी केली जात आहे. या विवाह नोंदणीवेळी साक्षीदार म्हणून स्वाक्षरी केल्याचा संशय असलेल्या सियाच्या » पान ७ वर

# कॉकरोच पार्टीचे एक्स खाते पुन्हा सुरू करा! हायकोर्टाचे आदेश

■ नवी दिल्ली

**दिल्ली उच्च** न्यायालयाने कॉकरोच पार्टीला मोठा दिलासा देत मे महिन्यात ब्लॉक केलेले एक्स खाते अनब्लॉक करून पुन्हा सुरू करण्याचे सरकारला आदेश दिले. दरम्यान, नीट-यूजी पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकार, शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांची अंमलबजावणी आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी जंतर-मंतर येथे कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन आज १८व्या दिवशीही सुरूच होते. तर सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक सलग दहाव्या दिवशी बेमुदत उपोषणावर ठाम असून, त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. आतापर्यंत त्यांचे ७.३ किलो वजन घटले आहे. दिल्ली उच्च न्यायालयात आज कॉकरोच पार्टीच्या ब्लॉक करण्यात आलेल्या एक्स खात्याशी संबंधित प्रकरणाची न्या. स्वर्ण कांता शर्मा यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणी झाली. या सुनावणीत केंद्र सरकारने खाते सुरू करण्यास कोणतीही हरकत नसल्याचे स्पष्ट केले.


# ई-२० मुळे वाहनांच्या इंजिनमध्ये बिघाड होतो

## पंपचालकांची तक्रार! सरकारचे सबुरीचे धोरण

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** परिवहन व रस्ते आणि महामार्ग खात्याचे मंत्री नितीन गडकरी यांच्या महत्त्वाकांक्षी इथेनॉल मिश्रीत पेट्रोल धोरणावर वाहनधारक आणि पेट्रोलपंप चालक नाराज आहेत. सध्या सरकारचे ई-२० (पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल) धोरण लागू आहे आणि ई-२५ इंधन (पेट्रोलमध्ये २५ टक्के इथेनॉल) आणण्याची तयारी काही दिवसांपूर्वी सुरू होती. मात्र सरकारने काहीसे सबुरीने घेत आता ई-२५ धोरण लांबणीवर टाकल्याचे सुत्रांनी सांगितले.

इथेनॉल मिश्रीत पेट्रोलचे म्हणजेच ई-२० उद्दिष्ट्य सन २०३० पर्यंत गाठण्याचे लक्ष्य सरकारने डोळ्यासमोर ठेवले



होते. मात्र प्रत्यक्षात २०२५-२०२६ या वित्तीय वर्षातच हे उद्दिष्ट्य सरकारने साध्य केले. त्यानंतर देशभरात टप्प्याटप्प्याने ई-२० पेट्रोलचा पुरवठा वाढवण्यात आला.

पुढे जाऊन ई-८५ (फ्लेक्स फ्युएल) आणि ई-१०० इंधनावरही सरकार काम करत आहे. मात्र भारतात तयार होणारी पेट्रोलवर चालणारी वाहने ई-२० इंधनाच्या वापरासाठी सुसंगत नाहीत. त्यामुळे ई-२० इंधनामुळे वाहनांच्या इंजिनमध्ये वारंवार बिघाड होतात अशी वाहनचालकांची तक्रार आहे. दुसरीकडे ई-२० इंधनामुळे वाहनाचे मायलेज कमी होते, अशीही वाहनचालकांची तक्रार आहे. केंद्रीय » पान २ वर

# कुरार नाल्यात वाहून गेलेल्या योगेश वर्माचा मृतदेह शोधा

■ मुंबई

**मालाड** पूर्व येथील दिंडोशी-कुरार व्हिलेज परिसरातील तानाजी नगर येथे नाल्यात वाहून गेलेल्या योगेश वर्मा यांच्या मृतदेहाचा तातडीने शोध घ्यावा, अशी मागणी उबाठा आमदार सुनील प्रभू यांनी आज विधानसभेत केली. सुनील प्रभू यांनी सभागृहात हा मुद्दा उपस्थित करताना सांगितले की, ५ जून रोजी रात्री दिंडोशी-कुरार व्हिलेज परिसरात नाल्यात पडून योगेश वर्मा वाहून गेले. या घटनेनंतर त्यांच्या कुटुंबियांनी कुरार पोलीस ठाण्यात तक्रार दिली. मात्र, संबंधित यंत्रणांकडून दखल घेतली गेली नाही. मुंबई महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे आणि अग्निशमन दलाकडेही पाठपुरावा करण्यात आला. पण त्यांनी देखील या घटनेची दाखल घेतली नाही. प्रशासनाने या प्रकरणात अधिक गांभीर्याने काम करावे आणि योगेश वर्मा यांच्या मृतदेहाचा तातडीने शोध घ्यावा. यावर उत्तर देताना मंत्री आशिष शेलार यांनी प्रशासनामार्फत आवश्यक ती शोधमोहीम राबविण्यात येईल.

# जलद न्यायासाठी राज्यात १३८ फास्ट ट्रॅक न्यायालये बनणार

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची माहिती**

■ मुंबई

**राज्यातील** नागरिकांना जलद आणि प्रभावी न्याय मिळावा, यासाठी सरकार कटिबद्ध असून, बलात्कार आणि पोक्सो कायद्यांतर्गत प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यासाठी राज्यात १३८ विशेष जलदगती न्यायालयांचे नियोजन करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

भाजपा आमदार राहुल कुल यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित करत बारामती आणि खेड येथेही विशेष न्यायालये स्थापन करण्याची मागणी केली. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य



सरकारची भूमिका स्पष्ट केली. मुख्यमंत्री म्हणाले की, महिलांवरील बलात्कार तसेच पोक्सो कायद्यांतर्गत बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी १०८ विशेष जलदगती न्यायालये आणि पोक्सो कायद्यांतर्गत ३० विशेष जलदगती न्यायालये अशा एकूण १३८ न्यायालयांना मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ५८ न्यायालये सध्या कार्यरत आहेत. शासन निर्णयानुसार पुणे मुख्यालयात एक विशेष पोक्सो न्यायालय आणि ११ विशेष जलदगती न्यायालये, बारामती येथे दोन विशेष जलदगती न्यायालये तसेच खेड येथे दोन विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# वाहतूक व्यवसायासाठी आता अधिवास दाखला सक्तीचा

■ मुंबई

**राज्यातील** बेकायदेशीर बाईक-टॅक्सींच्या मुद्यावर विधानसभेत आज चर्चा झाली. आमदार दिलीप लांडे यांनी अनधिकृत वाहतूक आणि विनापरवाना प्रवासी सेवा देणाऱ्या वाहनांचा प्रश्न उपस्थित करत सरकारकडे कठोर कारवाईची मागणी केली. वाहतूक व्यवसायासाठी डोमिसाईल (अधिवास दाखला) सक्तीचे करण्यात येणार असून, बाईक-टॅक्सी सेवेसाठी प्रतिदिन ५ रुपये शुल्क व प्रत्येक फेरीवर २ टक्के कल्याणकारी निधी (वेल्फेअर फंड) आकारण्यात येणार असल्याची घोषणा आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली.

राज्यात सध्या बेकायदेशीर वाहनांचा आणि विनापरवाना चालणाऱ्या वाहतुकीचा सुळसुळाट झाला आहे. अनेक चालकांकडे आवश्यक कागदपत्रे तसेच वैध ड्रायव्हिंग लायसन्स नसते. त्यामुळे अशा वाहनांतून प्रवास करणारे विद्यार्थी आणि महिला सुरक्षित नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या प्रकरणांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी लांडे यांनी केली.

# जामोद आदिवासी पिता-पुत्र छळप्रकरण विधानसभेत गाजले! पोलिसांवर कारवाई

■ मुंबई

**बुलडाणा** जिल्ह्यातील जळगाव जामोद येथील निर्दोष आदिवासी पिता-पुत्राला चुकीच्या पद्धतीने अटक करून अमानुष छळ केल्याचा मुद्दा आज विधानसभेत चांगलाच गाजला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दोषी पोलीस अधिकाऱ्यांना तातडीने सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात पोलिसांकडून गंभीर चूक झाल्याचे मान्य करत संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई, विभागीय चौकशी आणि चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर सेवेतून बडतर्फीची (निष्कासनाची) कारवाई करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले.

रोहित पवार म्हणाले की, जळगाव जामोद प्रकरणात 'जय भीम' चित्रपटाप्रमाणे, खरे आरोपी सापडत नसल्याने निर्दोष आदिवासी पिता-पुत्रावर अमानुष छळ केला. ज्या महिलेचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले, तीच महिला जिवंत आढळल्याने तपासातील गंभीर त्रुटी उघड झाल्या. त्यांच्यावर केवळ निलंबन नव्हे, तर दोषी पोलिसांना सेवेतून बडतर्फ करावे, पीडित कुटुंबाला ५ ते १० लाखांची मदत द्यावी आणि मूळ हत्येचा तपास निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावा. यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जळगाव जामोद प्रकरणात पोलिसांकडून अत्यंत गंभीर आणि लाजिरवाणी चूक झाली. बेपत्ता मुलीचाच मृतदेह असल्याचा निष्कर्ष वैज्ञानिक तपासणी पूर्ण होण्यापूर्वीच काढला.

## विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन



# चमत्काराने आजार बरे करण्याचा दावा मालाडमधील शाळेविरोधात गुन्हा दाखल

■ मुंबई

**मालाड** (पश्चिम) येथील रिजॉईस इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित प्रार्थना कार्यक्रमाबाबत दाखल करण्यात आलेल्या तक्रारीचा मुद्दा आज विधानसभेत गाजला. भाजपा आमदार अतुल भातखळकर यांनी हा विषय उपस्थित करत सरकारकडे कारवाईबाबत माहिती मागितली. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस तपासात धर्मांतराची बाब निष्पन्न झाली नसून त्या ठिकाणी चमत्काराने आजार बरे करण्याचा दावा केला जात होता. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली.

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पोलीस तपासादरम्यान धर्मांतराची घटना घडल्याचे आढळून आलेले नाही. तसेच हिंदू देवदेवतांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचेही निष्पन्न झालेले नाही. तक्रारदारांना त्यांच्या घरात देवदेवतांचे फोटो ठेवू नका, असे सांगण्यात आल्याने त्यांच्या धार्मिक भावना दुखावल्याचे तपासात उघडकीस आले आहे. कार्यक्रमाचा आयोजक आणि आरोपी लोकांच्या डोक्यावर हात ठेवून त्यांचे आजार व दुःख बरे करतो, असा आभास निर्माण करत होता. या प्रकरणात अंधश्रद्धा पसरविण्याचा प्रकार घडल्याने मालाड पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



धारावी येथील राजीव गांधी नगर येथे भरवस्तीत अजगर आढळून आला. त्याला रेस्क्यू करून नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. (छाया: दीपक साळवी)

# वाराणसी-नागपूर रेल्वे प्रवासात महाराष्ट्रातील महिलांशी गैरवर्तन

■ नागपूर

**वाराणसीहून** नागपूरकडे येणाऱ्या दानापूर-सिकंदराबाद एक्स्प्रेसमधील प्रवासात नागपूरच्या काही महिलांना छेडछाड, अश्लील शेरेबाजी आणि गैरवर्तनाला सामोरे जावे लागल्याचा दावा त्यांनी केला आहे. रेल्वेच्या हेल्पलाईन क्रमांक १३९ वर तसेच सोशल मीडियावर तक्रार करूनही वेळेत कोणतीही प्रभावी कारवाई झाली नसल्याचा आरोपही पीडित महिलांनी केला आहे.

पीडित महिलांच्या म्हणण्यानुसार, ३ जुलै रोजी वाराणसीहून नागपूरकडे येत असताना दानापूर-सिकंदराबाद एक्स्प्रेसच्या राखीव डब्यात सुमारे ४०० अनधिकृत प्रवासी शिरले. त्यांनी डब्यात प्रवेश करतानाच महिलांना छेडछाड, अश्लील शेरेबाजी आणि धक्काबुक्कीला सामोरे जावे लागले. याप्रकरणी रेल्वे हेल्पलाईन १३९ आणि सोशल मीडियावर तक्रार करूनही वेळेत कोणतीही कारवाई झाली नाही. ट्रेन पुढे निघाल्यानंतर गैरवर्तनाचे प्रकार वाढले. त्यामुळे नैनी रेल्वे स्थानकावर त्यांनी कुटुंबियांसह रेल्वे थांबवून आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली. त्यानंतर रेल्वे पोलीस घटनास्थळी पोहोचले. मात्र, त्यांनी पीडितानाच गर्दीतून आरोपी ओळखण्यास सांगितले. तिकीट तपासनीस (टीटीई) घटनास्थळी आला नाही. त्यानंतर रात्री उशिरा डब्यातील दिवे बंद झाल्यानंतर काही जणांनी महिलांच्या जवळ येऊन झोपणे, त्यांच्या शरीराला जाणूनबुजून स्पर्श करणे आणि अश्लील वर्तन करणे असे प्रकार केले. त्यामुळे संपूर्ण प्रवास भीतीच्या वातावरणात करावा लागला.

# पावसामुळे भिवंडीतील अनेक भाग अंधारात! टोरेंट पॉवरकडून अलर्ट

■ भिवंडी

**मुसळधार** पावसामुळे भिवंडीतील अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून, त्याचा वीजपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी वीज वितरण यंत्रणा पाण्याखाली गेल्याने आणि वीज खांब, वाहिन्यांचे नुकसान झाल्याने अनेक भाग अंधारात आहेत. या पार्श्वभूमीवर टोरेंट पॉवरने नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत अलर्ट जारी केला.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, अनेक भागांमध्ये जलभराव झाल्यामुळे विद्युत अपघात टाळण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून वीजपुरवठा तात्पुरता बंद ठेवला आहे. पाणी ओसरल्यानंतरच वीजपुरवठा सुरक्षितपणे सुरू केला जाणार आहे. याशिवाय, सततच्या पावसामुळे वीज खांब, वीज वाहिन्या आणि इतर विद्युत यंत्रणांचे नुकसान झाले आहे. टोरेंट पॉवरच्या तांत्रिक पथकांकडून २४ तास काम सुरू आहे.

# एसआरए आपत्ती नियंत्रण कक्षास कल्याणकर यांची मध्यरात्री भेट

■ मुंबई

**झोपडपट्टी** पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए), बृहन्मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी मुंबईतील अतिवृष्टीच्या अनुषंगाने एसआरएच्या आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षास मध्यरात्री आकस्मिक भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी दिवसभरात प्राप्त झालेल्या तक्रारींचा सविस्तर आढावा घेतला. तसेच संबंधित तक्रारींवरील कार्यवाही व त्यांच्या निवारणाची सद्यस्थिती जाणून घेतली. यावेळी त्यांनी नियंत्रण कक्षातील कर्तव्यावर असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली.



मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियंत्रण कक्षाच्या एकूण कार्यपद्धतीचा आढावा घेत आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत असल्याची खात्री केली. तसेच प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीवर तातडीने व प्रभावीपणे कार्यवाही करून नागरिकांना आवश्यक ती मदत वेळेत उपलब्ध करून देण्याच्या मौलिक सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# कोस्टल रोड प्रकल्प बाधितांची मागणी पर्यायी घरे द्या! मगच झोपड्या पाडा

■ मुंबई

**महानगर** पालिकेच्या माध्यमातून वर्सोवा ते दहिसरपर्यंत कोस्टल रोड बांधण्यात येत आहे. या कोस्टल रोडच्या आड येणाऱ्या गोरेगाव भगतसिंग नगरातील अंदाजे २५०० झोपडपट्ट्या पाडण्यात येणार आहेत. या प्रकल्पबाधितांना प्रथम पर्यायी घरे द्या. मगच आमच्या झोपड्या पाडा, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना गोरेगाव काँग्रेस ब्लॉक प्रदेश अध्यक्ष गौरव राणे यांनी सांगितले की, येथील भगतसिंग नगर नंबर १ आणि २ मधील हजारो झोपडपट्ट्या पालिका कोस्टल रोड प्रकल्पअंतर्गत पाडणार आहे. आमचे एकच म्हणणे आहे.

प्रकल्पबाधित होणाऱ्या झोपड्यांचे सर्वेक्षण करून पात्रता निश्चित करावी. तसेच शासनाच्या धोरणानुसार बाधितांचे जवळपास पुनर्वसन करण्यात यावे. या मागणीचा संबंधित विभागांनी विचार न केल्यास एकही झोपडी पाडू दिली जाणार नाही. वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून पालिकेच्या बुलडोझरला विरोध करण्याची तयारी रहिवाशांनी केली आहे.

# महिन्यातच कामे कोसळतात! फडणवीसांनी विकास शिकवू नये

**राऊतांचा हल्लाबोल**

■ मुंबई

**भाजपा** सरकारच्या काळात झालेल्या विकासकामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून, एकाच पावसात मिसिंग लिंक, मेट्रो, रस्ते, लोकल आणि इतर पायाभूत सुविधांची पोलखोल झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्लाबोल करत उबाठा खासदार संजय राऊत यांनी महिनाभरातच कोसळणारी कामे करणाऱ्यांनी आम्हाला विकासाचे धडे देऊ नयेत, असा टोला लगावला.



संजय राऊत म्हणाले की, भाजपा सरकारच्या काळात झालेल्या विकासकामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून मेट्रो, लोकल, बेस्ट बस आणि इतर पायाभूत सुविधांची अवस्था एका पावसात उघडी पडली आहे. कमिशनखोरीमुळे जनतेचे हजारो कोटी रुपये वाया गेले असून, विकासपुरुष आणि इन्फ्रामॅन अशी प्रतिमा निर्माण करणाऱ्या नेतृत्वाचे वास्तव उघड झाले. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील मिसिंग लिंकसारखे प्रकल्पही कोसळत असल्याने देवेंद्र फडणवीस यांनी आम्हाला विकासाचे धडे देऊ नये.

मनसे नेते संदीप देशपांडे यांनीही एक्सवर पोस्ट करून सरकारवर टीका करताना लिहिले की, मिसिंग लिंक वर दरड कोसळली त्याला नेहरूच जबाबदार आहेत आणि तरीसुद्धा ज्यांना सरकारवर टीका करायची आहे, त्यांनी पाकिस्तानला निघून जावे.

# मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यांसाठी एकच बोधचिन्ह

■ मुंबई

**मुंबईतील** सर्व पोलीस ठाण्यांसाठी एकच अधिकृत बोधचिन्ह लागू करण्याचा निर्णय मुंबई पोलीस दलाने घेतला आहे. या एकसमान बोधचिन्हामुळे आता सर्व पोलीस ठाण्यांचे वेगळे लोगो जाऊन एकच अधिकृत मानके असलेली ओळख संपूर्ण शहरात प्रस्थापित झाली आहे.

शहरातील सर्व ९९ पोलीस ठाणी, गुन्हे शाखा, विशेष शाखा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यालयांना आता एकच अधिकृत बोधचिन्ह वापरण्याचे कडक आदेश देण्यात आले आहेत. या बोधचिन्हात 'अभय मुद्रा' दाखवणारा हात, ढाल दर्शवणारे दुहेरी वर्तुळ आणि पारंपरिक पोलीस प्रतीक असलेला तारा समाविष्ट आहे. या बोधचिन्हावर 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीदवाक्य ठळकपणे लिहिलेले आहे.



# पडळकर-खोत यांना हायकोर्टाचा दणका सांगली डीसीसी बँकेची भरती स्थगिती रद्द

■ सांगली

**सांगली** जिल्हा मध्यवर्ती सहकारी (डीसीसी) बँकेतील ४४४ कनिष्ठ लिपिक पदांच्या भरती प्रक्रियेवरील राज्य सरकारची स्थगिती मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने रद्द केली. सरकारला आपली भूमिका मांडण्यासाठी १५ दिवसांची मुदत देताना, तोपर्यंत भरती प्रक्रिया थांबवता येणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे या भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला असून, भरतीला विरोध करणारे आमदार गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांना हा धक्का मानला जात आहे.

विधानपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेचे कारण देत राज्याच्या सहकार विभागाने २ जुलै रोजी या भरती प्रक्रियेला स्थगिती दिली होती. मात्र, निवडणुकीचा निकाल लागल्यानंतरही स्थगिती कायम ठेवल्याने सांगली डीसीसी बँकेने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सुनावणीदरम्यान न्यायालयाने सरकारची स्थगिती कायम ठेवण्यास नकार देत भरती प्रक्रिया सुरू ठेवण्याचे निर्देश दिले.

सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेने २४ जूनपासून आयबीपीएसमार्फत ४४४ कनिष्ठ लिपिक पदांसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया अद्याप सुरू असून, न्यायालयाच्या निर्णयानंतर भरतीला वेग येण्याची शक्यता आहे.

# कोचिन शिपयार्डमधील पाच टक्के हिस्सा विक्री सुरू

■ नवी दिल्ली

**कोचिन** शिपयार्ड लिमिटेड या सार्वजनिक क्षेत्रातील (सरकारी मालकीच्या) कंपनीतील पाच टक्के हिस्सा विकण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. ऑफर फॉर सेलच्या (ओएफएस) माध्यमातून ही हिस्सा विक्री केली जात आहे. आज संस्थापक गुंतवणूकदारांना समभाग खरेदीसाठी संधी देण्यात आली. तर उद्या किरकोळ गुंतवणूक अर्ज करू शकतील. प्रति समभाग १,४०० रुपयांच्या आधारभूत किमतीवर सरकार ही समभाग विक्री करत आहे. दीपम मंत्रालयातील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार २.५२ टक्के हिस्सा सर्वसाधारणपणे तर अतिरिक्त २.५२ टक्के विक्री ग्रीन शू ऑप्शनच्या माध्यमातून केली जाणार आहे.निश्चित केलेली आधारभूत १,४०० रुपये आधारभूत किंमत ही कोचिन शिपयार्डच्या सोमवारच्या १,५०२.७५ रुपयांच्या बंदभावापेक्षा ७ टक्के कमी आहे. म्हणजे गुंतवणूकदारांना ७ टक्के सवलतीच्या दरात समभाग विकत घेता येणार आहे. कोचिन शिपयार्डमध्ये सध्या केंद्र सरकारची ६७.९१ टक्के हिस्सेदारी आहे.




# बेस्टच्या १९० बस चालकांचा पगार आता महापालिका देणार

**उसनवारी तत्त्वावर चालक पालिका सेवेत**

■ मुंबई

**गेल्या** काही वर्षांपासून तोट्यात चाललेल्या बेस्टला आता मुंबई पालिका मोठा हातभार लावणार आहे. बेस्टमधील तब्बल १९० चालकांना उसनवारी तत्त्वावर घेऊन त्यांचा पगार खर्च महापालिका अदा करणार आहे. पुढील एक वर्षासाठी ही उसनवारी सेवा पुरवली जाणार असून, याबाबतचा प्रस्ताव उद्या होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत मांडला जाणार आहे.



या उसनवारी तत्त्वावर घेतल्या जाणाऱ्या या १९० बेस्ट चालकांना महिन्याला १०० तासांप्रमाणे मासिक ४५ हजार वेतन दिले जाईल. याप्रमाणे वार्षिक एका चालकाला १ लाख १९ हजार म्हणजेच १९० चालकांना ३० कोटी ६२ लाख ३५ हजार ७३८ रुपये इतकी रक्कम अदा केली जाणार आहे. सध्या पालिकेच्या वाहनचालकांची संख्या आवश्यकतेपेक्षा कमी आहे. त्यामुळे महापौर, उपमहापौर, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, वैधानिक व विशेष समित्यांचे अध्यक्ष तसेच, पालिका आयुक्तांसह अन्य वरिष्ठ अधिकारी यांना वाहनसेवा पुरवताना पालिकेला चालकांकडून जास्त वेळ काम करून घ्यावे लागते. त्यामुळे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात प्रथमतः बेस्ट उपक्रमांकडून एक वर्षाच्या कालावधीसाठी व आवश्यकता भासल्यास अधिक एक वर्षाकरिता बेस्टकडील १९० वाहन चालक उसनवारी तत्त्वावर घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

नवाकाळ
|| न मे भक्त प्रणश्यति ||

# सहकारी विमा कंपनी की राजकीय छत्री?

केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन केल्यापासून देशभरात फार मोठे परिवर्तन घडून येत असल्याचा दावा केला जातो आहे. सहकाराच्या माध्यमातून सामान्यातल्या सामान्य माणसाला सहजपणाने अधिकाधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा प्रयत्न दिसतो. सहकाराच्या माध्यमातून सामान्य माणसाच्या जीवनात समृद्धी निर्माण करण्याचा प्रमुख हेतू असल्याचे केंद्रीय सहकार मंत्र्यांकडून वारंवार सांगितले जाते आहे. अलिकडेच देशपातळीवर सहकार दिन साजरा झाला. आणि त्याच्या मुख्य कार्यक्रमात बोलताना केंद्रीय सहकार मंत्र्यांनी घोषणा केली. ती म्हणजे सहकारी तत्त्वावर विमा व्यवसाय सुरू केला जाणार आहे. ही घोषणा जर प्रत्यक्षात येणार असेल तर तो जागतिक स्तरावरचासुद्धा पहिला प्रयत्न ठरू शकतो. आज जगभर किंवा भारतातसुद्धा विमा क्षेत्रात खासगी कंपन्यांची मक्तेदारी आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळ किंवा नॅशनल इश्युरन्स कंपनी यासारख्या सरकारची सर्वाधिक भागिदारी असलेल्या कंपन्यांशिवाय इतर खासगी कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर आपला जम बसवलेला आहे. सरकारला सहकारी क्षेत्रात विमा व्यवसाय सुरू करण्याची आवश्यकता का वाटावी? याचादेखील विचार महत्त्वाचा ठरतो. ज्याअर्थी सरकार विम्यासारख्या अतिशय महत्त्वाच्या क्षेत्रात सहकार तत्त्वाचा अवलंब करणार असेल तर सध्याच्या विमा कंपन्यांपेक्षा अधिक लोकाभिमुख विमा व्यवसाय सरकारला अभिप्रेत आहे हे स्पष्ट होते. सध्याच्या विमा कंपन्या या पूर्णपणे व्यावसायिक तत्त्वावर काम करतात. प्रचंड नफा कमावणे हाच त्यांचा उद्देश असतो. अशा परिस्थितीत जर सहकारी तत्त्वातून विमा व्यवसायाला बळ मिळणार असेल तर ते निश्चितच उपयुक्त ठरू शकते. परंतु या सहकारी विमा कंपनीचे स्वरूप ना नफा ना तोटा हे उद्दिष्ट ठेवूनच तयार केले गेले पाहिजे. सरकारचा हेतू चांगलाच आहे. परंतु एकूणच सध्याचे सहकार क्षेत्राचे स्वरूप लक्षात घेतले तर अशा प्रकारची विमा कंपनी यशस्वी होण्याकरीता सरकारला बरीच मोठी भांडवली गुंतवणूक करावी लागेल.

### स्वाहाकाराचा प्रभाव

प्रामुख्याने ही सहकारी विमा कंपनी सहकारी संस्थांच्या सभासदांना विमा कवच उपलब्ध करून देईल. असे असेल तर ते कवच सहकारी बँकांच्या खातेदारांनाही उपलब्ध झाले पाहिजे. आज देशभरात सहकारी बँकांचं खूप मोठं जाळं आहे. या सहकारी बँका देशभरात २७ लाख कोटींचा व्यवसाय करतात. म्हणजे एकूणच भारताच्या अर्थव्यवस्थेत सहकारी बँकांच्या उलाढालीचा तेवढाच मोठा वाटा आहे. राष्ट्रीयकृत बँकांपेक्षाही सहकारी बँकांमधले व्यवहार सामान्य माणसाला अधिक सोयीचे आणि जवळचे वाटत असतात. विशेष म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांपेक्षा सहकारी बँकांचा विस्तार अधिक वेगाने होताना दिसून येतो. आज या बँकांमधल्या उलाढालीचा आकडा बघितला तर त्या सार्वजनिक बँकांशी चांगली स्पर्धा करू शकतात हे त्यातून सिद्ध होते. म्हणजे आतापर्यंत सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकार तत्त्वावरचे बाजार, अशा अनेक क्षेत्रात हे सहकार तत्त्व यशस्वी झालेले आहे. यातून सर्वसामान्य माणसाला थेट लाभ मिळत राहतात. याच प्रमुख धोरणाचा विस्तार सहकारी विमा कंपनीच्या माध्यमातून होऊ शकतो. मात्र या कंपनीचा व्यवहार हा पूर्णपणे सहकारी तत्त्वावर चालला पाहिजे. सरकारी नियंत्रण असलेली सहकारी विमा कंपनी असे त्याला स्वरूप येता कामा नये. बऱ्याच सहकारी संस्थांचे दिवाळेही निघत असते. किंबहुना अनेक ठिकाणी सहकाराच्या नावाने स्वाहाकार सुरू असतो. हा अनुभव लक्षात घेऊन या सहकारी विमा कंपनीची उभारणी करावी लागेल. विशेषतः आजच्या या सहकार क्षेत्रावर राजकारण्यांचे सर्वाधिक वर्चस्व पाहायला मिळते. मग साखर कारखाने असो, सहकारी बँका असो किंवा अगदी पतपेढ्या असो. एवढेच नव्हे तर गावपातळीवरची सहकारी दूध संघ किंवा विविध कार्यकारी सोसायट्या असतात. त्यासुद्धा स्थानिक पुढाऱ्यांच्याच ताब्यात असल्याचे पाहायला मिळते. सहकारावरचा हा राजकीय प्रभाव दुर्लक्षित करता येत नाही. तसा प्रकार या सहकारी विमा कंपनीबाबत होता कामा नये. अन्यथा ती सहकारी राजकीय विमा कंपनी ठरू शकेल.

### हमी कोण घेणार?

आज देशभरामध्ये या सहकारी धोरणाचा वेगवेगळ्या पद्धतीने उपयोग केला जातो आहे. सरकारनेच सहकारी तत्त्वावरची भारत टॅक्सी सेवा सुरू केली आहे. दिल्ली आणि अहमदाबाद या ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर सुरू आहे. तिला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन आता देशाच्या पाचशे शहरांमध्ये ही सहकारी भारत टॅक्सी सेवा सुरू होणार आहे. अन्य टॅक्सीसेवांपेक्षा याचे वेगळेपण अधिक स्पष्ट झाले पाहिजे. मग कमी भाड्यातली सेवा आणि ओला उबेरला स्पर्धा करू शकेल अशी तत्पर सेवासुद्धा दिली गेली पाहिजे. स्वाभाविकपणे सहकारी विमा कंपनी स्थापन झाल्यानंतर त्याचा लाभ या टॅक्सी चालकांनाही होऊ शकेल. सहकारी विमा कंपनीचा सर्वाधिक लाभ हा खरे तर देशभरात काही कोटींच्या संख्येत असलेल्या गृहनिर्माण संस्थांना होईल. कारण गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांची संख्या प्रचंड मोठी आहे. त्यांनादेखील या सहकारी विमा कंपनीचे लाभ उपलब्ध होऊ शकतात. थोडक्यात सांगायचे तर सहकारी संस्थांच्या अनेक सभासदांची हमी ही विमा कंपनी घेईल, पण या विमा कंपनीची हमी सरकार घेणार आहे का? हेसुद्धा स्पष्ट व्हायला हवे. सरकारने विचारपूर्वक विमा क्षेत्र निवडलेले दिसते. त्यात सामान्य माणसाचे हित नेमके कोणत्या आणि कशा पद्धतीने जपले जाईल हे येणाऱ्या काळात कळेल. सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रातल्या विमा कंपन्यांमध्ये सरकारला थेट हस्तक्षेप करता येत नाही. सहकार क्षेत्रात मात्र ही संधी सरकारला साधता येईल. म्हणून ही विमा कंपनी राजकीय छत्री होऊ नये एवढीच अपेक्षा आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

काम करणाऱ्याचे हात मळतात, पण नाव मात्र स्वच्छ कपडे घालणाऱ्याचं होतं. हीच तर जगाची रीत आहे.

## पंचांग

**बुधवार, ८ जुलै २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ कृष्ण अष्टमी**
**नक्षत्र : रेवती**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते १५-५९ मीन**
**१६-०० ते २४-०० मेष**

**रवी उदय- ०६-०८**
**रवी अस्त- १९-१९**

**संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान- आळंदी**
**डॉ.नानासाहेब धर्माधिकारी स्मृतिदिन, ॲलर्जी प्रतिबंधक दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### सुरमईचा खिमा



★ **साहित्य :** सुरमई मासे- ५०० ग्रॅम (काटे काढून बारीक केलेले), कांदे- २ मोठे (बारीक चिरलेले), टोमॅटो- १ मोठा (बारीक चिरलेला किंवा प्युरी), आले-लसूण पेस्ट- १ ते २ चमचे, हिरव्या मिरच्या- ३-४ (बारीक चिरलेल्या), मसाले- हळद, लाल तिखट, गरम मसाला, धने-जिरे पावडर (आवडीनुसार), इतर- तेल, चवीनुसार मीठ आणि बारीक चिरलेला कोथिंबीर.

★ **कृती :** मसाला तयार करणे- एका कढईत तेल गरम करून त्यात जिरे, कढीपत्ता आणि बारीक चिरलेला कांदा सोनेरी रंगावर परतून घ्या. त्यात आले-लसूण पेस्ट आणि हिरव्या मिरच्या घालून १ मिनिट परता. त्यानंतर टोमॅटो घालून तेलात मऊ होईपर्यंत शिजवा. आता सर्व कोरडे मसाले आणि मीठ घालून मसाला चांगल्या प्रकारे भाजून घ्या, जोपर्यंत बाजूने तेल सुटू लागत नाही. यात बारीक केलेले सुरमईचे तुकडे (खिमा) टाका आणि मसाल्यात हलक्या हाताने मिसळा. पाणी न घालता किंवा अगदी थोडे पाणी शिंपडून झाकण ठेवा आणि १० ते १५ मिनिटे मंद आचेवर शिजू द्या. वरून बारीक चिरलेली कोथिंबीर आणि लिंबाचा रस पिळून गरम-गरम पोळी, भाकरी किंवा भातासोबत सर्व्ह करा.

## क्रीडा

# मेरिनोच्या गोलमुळे स्पेनचा पोर्तुगालवर विजय

## रोनाल्डोचा विश्वचषक कारकिर्दीचा शेवट



**फिफा विश्वचषकाच्या उपउपांत्य फेरीतील शेवटच्या अतिरिक्त वेळेत मिकेल मेरिनोच्या केलेल्या गोलमुळे स्पेनने पोर्तुगालचा १-० ने पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. या पराभवासह दिग्गज फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या ऐतिहासिक विश्वचषक कारकिर्दीचा अधिकृतपणे शेवट झाला आहे. सामना संपताच रोनाल्डो खूप भावूक झाला होता.**

■ टेक्सास

**सामन्याच्या** निर्धारित वेळेच्या शेवटच्या काही मिनिटांत बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या मेरिनोने ९०+१ व्या मिनिटाला निर्णायक गोल नोंदवला. फेरान टोरेसने दिलेल्या चपळ पासचा फायदा घेत त्याने पोर्तुगालचा गोलकीपर डियोगो कोस्टाला चकित करत चेंडू नेटमध्ये धाडला. २०१० नंतर पहिल्यांदाच स्पेन विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला आहे. सलग ३५ सामने अपराजित राहण्याचा पराक्रम करणाऱ्या पोर्तुगालचा पुढचा सामना शुक्रवारी बेल्जियमशी होणार आहे. या विजयामुळे स्पेनचा गोलकीपर उनाई सिमॉनने विश्वचषकात सलग ६०९ मिनिटे एकही गोल न स्वीकारण्याचा एक विशेष विक्रम प्रस्थापित केला.

४१ वर्षीय सुपरस्टार ख्रिस्तियानो रोनाल्डोसाठी हा विश्वचषक स्पर्धेतील शेवटचा सामना ठरला. सामन्याच्या निकालाने भावूक झालेल्या रोनाल्डोने आपल्या कारकिर्दीतील या शेवटच्या विश्वचषक मोहिमेबद्दल दुःख व्यक्त केले, मात्र त्याने आपल्या संघसहकाऱ्यांच्या कामगिरीचा अभिमान असल्याचेही नमूद केले. रोनाल्डो पत्रकारांना म्हणाला की, विश्वचषकातून अशा प्रकारे बाहेर पडल्यामुळे मला दुःख झालं आहे. मी माझे सर्वस्व पणाला लावले, माझे सर्वोत्तम दिले आणि मी स्पष्ट मनाने बाहेर पडत आहे. होय, हा माझा शेवटचा विश्वचषक होता, आता मला विचार करण्यासाठी आणि माझ्या कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी मिळेल. मी भावनेच्या भरात कोणतेही निर्णय घेणार नाही.

मेरिनोचा हा गोल त्याच्या राष्ट्रीय संघासाठीचा ११वा गोल होता, ज्याने स्पेनला स्पर्धेच्या पुढील फेरीत नेले.

## अफगाणिस्तानचे माजी गोलंदाज शापूर झद्रान यांचे दिल्लीत निधन

■ नवी दिल्ली



**अफगाणिस्तानचे** माजी दिग्गज वेगवान गोलंदाज शापूर झद्रान यांचे वयाच्या ३८ व्या वर्षी आज नवी दिल्लीतील रुग्णालयात दीर्घ आजारामुळे निधन झाले. ते हेमोफॅगोसायटिक लिम्फोहिस्टिओ सायटोसिस या अत्यंत दुर्मिळ आणि जीवघेण्या आजाराशी झुंज देत होते.

त्यांनी २००९ ते २०२० दरम्यान अफगाणिस्तानचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी ४४ एकदिवसीय सामन्यांत ४३ विकेट आणि ३६ टी-२० सामन्यांत ३७ विकेट घेतल्या. २०१५ च्या आयसीसी एकदिवसीय विश्वचषकात ते अफगाणिस्तानकडून सर्वाधिक विकेट घेणारे गोलंदाज होते. २०१२ च्या टी-२० विश्वचषकात भारताविरुद्धच्या सामन्यात त्यांनी गौतम गंभीर आणि वीरेंद्र सेहवाग यांना बाद केले होते. त्यांच्या निधनावर अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डासह जगभरातील क्रिकेटपटू आणि चाहत्यांनी दुःख व्यक्त केले आहे.

## मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनचे निवासी पंच शिबीर संपन्न

■ मुंबई

**आंतरराष्ट्रीय** स्तरावर जेव्हा उपनगरच्या पंचांचा दबदबा निर्माण होईल तेव्हाच समाधान मिळेल, असे उद्गार संघटनेचे अध्यक्ष अमोल कीर्तिकर यांनी काढले. मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनच्या तीन दिवसांच्या निवासी पंच मार्गदर्शन शिबिरच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. राज्यात आपला दबदबा आहेच, पण आंतरराष्ट्रीय स्तरावर जेव्हा आमचे पंच अंतिम सामना खेळविताना पाहावयास मिळेल तेव्हा खऱ्या अर्थाने हे शिबीर यशस्वी झाले असे वाटेल, असे ते म्हणाले. आपल्या पंचाना योग्य प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळावे म्हणून त्यांनी दिल्लीचे आंतरराष्ट्रीय पंच अजितकुमार यांना खास पाचारण केले होते. त्यांनी अगदी मनापासून आपल्याकडे असलेले सर्व ज्ञान सढळ हस्ते पंचाना दिले. त्यांना उपनगरचे राष्ट्रीय पंच आत्माराम चव्हाण यांनी उत्तम सहकार्य केले. चव्हाण यांची पंचांना बोलते करण्याची कला लाजबाब होती.

## यजमान अमेरिकेला ४-१ने पराभूत करुन बेल्जियमची उपांत्यपूर्व फेरीत धडक

■ सिएटल

**सिएटलच्या** ल्युमेन फील्डवर सोमवारी रात्री झालेल्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत बेल्जियमने अमेरिकेचा ४-१ असा धुव्वा उडवत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

अमेरिकेच्या बचावातील ढिसाळपणाचा पुरेपूर फायदा घेत बेल्जियमने ही महत्त्वपूर्ण लढत एकतर्फी जिंकली. बेल्जियम शुक्रवारी इंग्लेवुड येथे २०१० चे विजेते स्पेनविरुद्ध लढत देणार आहे. सामन्याच्या सुरुवातीपासूनच बेल्जियमने आक्रमक पवित्रा घेतला होता. चार्ल्स डी केटेलेअरने शानदार कामगिरी करत दोन गोल नोंदवले, तर एक गोल करण्यासाठी साहाय्य केले. आठव्या मिनिटाला डी केटेलेअरने गोल करत बेल्जियमला आघाडी मिळवून दिली. ३१ व्या मिनिटाला अमेरिकेच्या मलिक टिलमनने फ्री-किकवर गोल करून स्कोअर १-१ असा बरोबर केला, मात्र हा आनंद क्षणभंगुर ठरला. गोलनंतर अवघ्या ६१ सेकंदात अमेरिकेने गोल स्वीकारला. पुन्हा एकदा डी केटेलेअरने हेडरद्वारे गोल करत बेल्जियमला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या हाफमध्ये अमेरिकन गोलकीपर मॅट फ्रीजच्या चुकीचा फायदा घेत हान्स व्हॅनाकेनने बेल्जियमसाठी तिसरा गोल केला, तर स्टॉपेज टाइममध्ये रोमेलू लुकाकूने गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

## कॅरम स्पर्धेत घुफ्रान आणि मधुरा विजयी

■ कोल्हापूर

**नरसोबा** वाडीतील हॉटेल मंगलम येथे श्री दत्तराज चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित कै. अशोक पुजारी यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या १० व्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या महम्मद घुफ्रानने आपल्या आक्रमक खेळाच्या जोरावर पुण्याच्या रहिम खानचा २५-०, २५-१५ असा सहज धुव्वा उडवत विजेतेपदाला गवसणी घातली. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत मुंबईच्या विकास धारियाने पुण्याच्या अभिजित त्रिपणकरचा तीन सेटनंतर २०-११, ३-२५ व १८-१३ असा पराभव केला.

**ऑरम प्रॉपटेक लिमिटेडच्या शेअर्सच्या नुकसानीची सूचना**
सीआयएन : L72300MH2013PLC244874
नोंदणीकृत कार्यालय- ऑरम क्यू १, ऑरम क्यू पार्क, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, महाराष्ट्र, ४००७१०
याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, खालील भाग प्रमाणपत्रे हरवल्याचे किंवा गहाळ झाल्याचे कळवण्यात आले असून, कंपनी योग्य वेळी त्याऐवजी दुसरी प्रमाणपत्रे जारी करणार आहे. कोणा व्यक्तिस सदर शेअर्सवर वैध दावा असल्यास, त्यांनी आपला दावा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात या तारखेपासून १५ दिवसांच्या आत दाखल करावा.

| भागधारकाचे नाव | फोलिओ क्र. | शेअर्सची संख्या (रु.५/-द.मू.) | प्रमाणपत्र क्र. | विशिष्ट क्र. |
|---|---|---|---|---|
| राज नायर<br>मोहना नायर | आर०००८३७ | ६६६६ | २६० | २०८५२६ - २१५१९१ |

दिनांक: ०८.०७.२०२६ राज नायर

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**मध्यवर्ती ई-निविदा कक्ष विभाग**
**जाहिर ई-निविदा सुचना क्र. १४ (सन २०२६-२७)**
नाशिक महानगरपालिका, नाशिक **सार्वजनिक बांधकाम विभागाकडील - 01** या कामाची जाहिर ई-निविदा सुचना क्रमांक १४ (सन २०२६-२७) दिनांक ०८/०७/२०२६ पासुन दिनांक २३/०७/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपावेतो मा.शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिसेल. निविदा स्विकृतीची अंतिम दिनांक २३/०७/२०२६ राहील.
**टीप** - यापुढील सर्व आवश्यक सुचना / शुध्दीपत्रक हे Online website वर प्रसिध्द करणेत येतील.
जनसंपर्क/जा.क्र./३८/२०२६
दि. ०७/०७/२०२६
गोदा प्रदुषण टाळा, भविष्य संभाळा.
स्वाक्षरीत/ -
कार्यकारी अभियंता
मध्यवर्ती ई- निविदा कक्ष प्रमुख
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**ट्रेन्ट लिमिटेड**
सीआयएन: L24240MH1952PLC008951
बॉम्बे हाऊस, २४ होमी मोदी स्ट्रीट, मुंबई, महाराष्ट्र, ४००००१
**भाग प्रमाणपत्र हरवल्याची सूचना**
येथे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीने जारी केलेले खालील भाग प्रमाणपत्रे हरवले/गहाळ झाली आहेत किंवा चोरीला गेल्याचे सांगण्यात आले आहे आणि त्यांच्या नोंदणीकृत धारकांनी दुय्यम भाग प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी कंपनीकडे अर्ज केला आहे.

| फोलिओ क्र. | प्रमाणपत्र क्र. | विशिष्ट क्र. | शेअर्स दर्शनी मूल्य १/- | भागधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| एलकेपी०००३४८८ | ५२२ | ५३९३८१ - ५४१४८० | २१०० | प्रविण एम झवेरी |

जनतेला याद्वारे उपरोक्त भाग प्रमाणपत्रे खरेदी करण्याविरोधात किंवा कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्याविरोधात इशारा देण्यात येत आहे. कोणा व्यक्तिस सदर भाग प्रमाणपत्रांबाबत कोणताही दावा असेल, त्यांनी तो दावा या सूचनेच्या प्रकाशनापासून १५ दिवसांच्या आत, कंपनीच्या वर दिलेल्या पत्त्यावरील नोंदणीकृत कार्यालयात आणि/किंवा आरटीए, एमयूएफजी इनटाईम इंडियन लिमिटेड, सी-१०१, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी पश्चिम, मुंबई - ४०० ०८३ येथे दाखल करावा, त्यानंतर असा कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही आणि कंपनी दुय्यम भाग प्रमाणपत्रे जारी करण्याची कार्यवाही करेल.
अर्जदाराचे नाव: हिरा श्रीवास्तव (कायदेशीर वारस)
दिनांक: ०८.०७.२०२६

**अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड**
सीआयएन: L65190GJ1994PLC021012
बी विंग, अहुरा सेंटर, २रा मजला, महाकाली केव्हज रोड, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, ४०००९३
**भाग प्रमाणपत्र हरवल्याची सूचना**
येथे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीने जारी केलेले खालील भाग प्रमाणपत्रे हरवले/गहाळ झाली आहेत किंवा चोरीला गेल्याचे सांगण्यात आले आहे आणि त्यांच्या नोंदणीकृत धारकांनी दुय्यम भाग प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी कंपनीकडे अर्ज केला आहे.

| फोलिओ क्र. | प्रमाणपत्र क्र. | विशिष्ट क्र. | शेअर्स दर्शनी मूल्य १०/- | भागधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ८११४९५५१ | २१७९२१ | १३२१३४९७६ - १३२१३५०१८ | ४३ | प्रविण एम झवेरी |
| ७०२७४७६१ | १०९४४३ | ३४४४४१४५ - ३४४४४२५४ | ११० | प्रविण एम झवेरी |

जनतेला याद्वारे उपरोक्त भाग प्रमाणपत्रे खरेदी करण्याविरोधात किंवा कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्याविरोधात इशारा देण्यात येत आहे. कोणा व्यक्तिस सदर भाग प्रमाणपत्रांबाबत कोणताही दावा असेल, त्यांनी तो दावा या सूचनेच्या प्रकाशनापासून १५ दिवसांच्या आत, कंपनीच्या वर दिलेल्या पत्त्यावरील नोंदणीकृत कार्यालयात आणि/किंवा आरटीए, केएफआयएन टेक्नॉलॉजीस लि., सेलेनियम इमारत, टॉवर-बी, प्लॉट क्र. ३१ आणि ३२, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरलिंगमपल्ली, हैदराबाद, तेलंगणा, ५०००३२ येथे दाखल करावा. त्यानंतर असा कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही आणि कंपनी दुय्यम भाग प्रमाणपत्रे जारी करण्याची कार्यवाही करेल.
अर्जदाराचे नाव: हिरा श्रीवास्तव (कायदेशीर वारस)
दिनांक: ०८.०७.२०२६

**लार्सन ॲण्ड टुब्रो लिमिटेड**
सीआयएन: L99999MH1946PLC004768
एल अँड टी हाऊस, बॅलार्ड इस्टेट, नरोत्तम मोरारजी मार्ग, मुंबई, महाराष्ट्र, ४००००१
**भाग प्रमाणपत्र हरवल्याची सूचना**
येथे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीने जारी केलेले खालील भाग प्रमाणपत्रे हरवले/गहाळ झाली आहेत किंवा चोरीला गेल्याचे सांगण्यात आले आहे आणि त्यांच्या नोंदणीकृत धारकांनी दुय्यम भाग प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी कंपनीकडे अर्ज केला आहे.

| फोलिओ क्र. | प्रमाणपत्र क्र. | विशिष्ट क्र. | शेअर्स दर्शनी मूल्य २/- | भागधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ७०२७४७६१ | १३४५६७२ | १३९४१०२२०४-१३९४१०२६१४ | ४११ | प्रविण एम झवेरी |
| ७०२७४७६१ | २५८१६६ | १४३६३२३०८-१४३६३२४४४ | १३७ | प्रविण एम झवेरी |
| ७०२७४७६१ | १०९४४२ | ५५५५७५०-५५५५८८६ | १३७ | प्रविण एम झवेरी |
| ७०२७४७६१ | ३७४०८२ | ५७९५६०१४२-५७९५६०४१५ | २७४ | प्रविण एम झवेरी |
| ७०२७४७६१ | ४६५८३३ | ६२०६७१४५७-६२०६७१७३० | २७४ | प्रविण एम झवेरी |

जनतेला याद्वारे उपरोक्त भाग प्रमाणपत्रे खरेदी करण्याविरोधात किंवा कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्याविरोधात इशारा देण्यात येत आहे. कोणा व्यक्तिस सदर भाग प्रमाणपत्रांबाबत कोणताही दावा असेल, त्यांनी तो दावा या सूचनेच्या प्रकाशनापासून १५ दिवसांच्या आत, कंपनीच्या वर दिलेल्या पत्त्यावरील नोंदणीकृत कार्यालयात आणि/किंवा आरटीए, केएफआयएन टेक्नॉलॉजीस लि., सेलेनियम इमारत, टॉवर-बी, प्लॉट क्र. ३१ आणि ३२, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरलिंगमपल्ली, हैदराबाद, तेलंगणा, ५०००३२ येथे दाखल करावा. त्यानंतर असा कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही आणि कंपनी दुय्यम भाग प्रमाणपत्रे जारी करण्याची कार्यवाही करेल.
अर्जदाराचे नाव: हिरा श्रीवास्तव (कायदेशीर वारस)
दिनांक: ०८.०७.२०२६

# चिमुरड्याने मध्यरात्री रॅपिडो बुक केली! ड्रायव्हरचा नकार

■ लखनौ

**लखनौत** एका ७ वर्षांच्या मुलाने रात्री १ वाजता गुपचूप राईड बुक केली. मात्र, रॅपिडो ड्रायव्हरने त्याला घरी पाठवले. याचा व्हिडिओ व्हायरल होत असून रॅपिडो ड्रायव्हरचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या व्हिडिओत असे दिसते की, रॅपिडो रायडर ग्राहकाला कॉल करून, पिक अपसाठी कुठे यायचे ते ठिकाण विचारत आहे. हे संभाषण चालू असताना त्याला कळते की, तो ग्राहक म्हणजे सात वर्षांचा लहान मुलगा आहे. हे समजताच त्याला धक्का बसतो. रायडर त्यालाविचारतो की, इतक्या रात्री उशिरा रॅपिडो ट्रिप का बुक केली? त्यावर मुलगा म्हणतो की, मला फक्त चहा प्यायला जायचे आहे. पालक कुठे आहेत असे विचारल्यावर, तो मुलगा शांतपणे उत्तर देतो की, ते झोपले आहेत. मी राईड बुक केली आहे, हे त्यांना ठाऊक नाही. ड्रायव्हर त्या मुलाला आपल्या सोबत नेण्यास नकार देतो आणि त्याच्या आई-वडिलांना उठवण्यास सांगतो. ड्रायव्हर म्हणतो की, मुलगा फक्त सात वर्षांचा आहे, त्याला त्याचे ठिकाणसुद्धा नीट सांगता येत नाही आणि तो रात्री एक वाजता एकटा प्रवास करण्याचा प्रयत्न करत आहे. पालकांच्या माहितीशिवाय एकट्या मुलाला घेऊन जाण्याची जबाबदारी घेणार नाही असे सांगून, तो हे बुकिंग रद्द करतो.

यावर सोशल मीडिया युजर या ड्रायव्हरचे कौतुक करत आहेत. मध्यरात्री त्या लहान मुलाला नकार देऊन रायडरनेच योग्य ते केले, अशी प्रतिक्रिया देत आहेत.

# पालख्या व वारकऱ्यांच्या वाहनांना टोलमाफी जाहीर

**आळंदी** - यंदाच्या आषाढी वारी काळामध्ये २९ जुलैपर्यंत दहा मानाच्या पालख्या, भाविक व वारकऱ्यांच्या हलक्या-जड वाहनांसाठी टोल नाक्यांवर टोलमाफी जाहीर केली. हा आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने उपसचिव निरंजन तेलंग यांनी काढला. या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २४ जून रोजी बैठक संपन्न झाली होती. त्या अनुषंगाने फडणवीस यांनी विविध विभागांना सूचना आणि निर्देश दिले होते.

# 'पीएमसी'च्या हद्दीतील रायगड जिप शाळांच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू

■ पनवेल

**पनवेल** महानगरपालिकेच्या (पीएमसी) हद्दीत येणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेच्या शाळा पालिकेकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासंदर्भात पनवेल महानगरपालिका आणि रायगड जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची एक संयुक्त बैठक संपन्न झाली. पीएमसीचे महापौर नितीन पाटील हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.तर रायगड जिल्हा परिषदेचे मंगेश वाकडीकर बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत शाळा हस्तांतरणाच्या निर्णयावर सहमती झाली.

अधिकाऱ्यांनी सर्व शाळांच्या गुणवत्तेची तपासणी करून विद्यार्थ्यांचे संभाव्य शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शाळा हस्तांतरणाचे काम वेगाने हाती घेण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार पीएमसीने हे काम सुरू केले आहे. हस्तांतरणासाठी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणे जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांना पीएमसीकडे वर्ग करणे आणि अन्य तांत्रिक बाबींची पूर्तता सध्या केली जात आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक कारकीर्द, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेडसावत असलेल्या समस्या, शाळांची सद्यस्थिती आणि भविष्यात करावयाच्या सुधारणा या बाबींवरही बैठकीत सविस्तर विचार विनिमय करण्यात आला.


# मुलीची बलात्कार करून हत्या जमावाच्या मारहाणीत आरोपी ठार

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालच्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील बरुईपूर येथे १२ वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. तिचा मृतदेह पोत्यात भरून तलावात फेकून देण्यात आला. या घटनेनंतर संतप्त झालेल्या लोकांनी एका संशयित आरोपीला बेदम मारहाण करुन त्याची हत्या केली आहे. पीडित मुलगी मैत्रिणीसाठी भेटवस्तू (गिफ्ट) आणण्यासाठी घराबाहेर पडली होती. त्यानंतर ती बेपत्ता झाली. काल सकाळी तिचा मृतदेह घराजवळील सूर्यपूर हाट परिसरातील एका तलावात पोत्यात भरलेला आढळला. त्यानंतर संतप्त लोकांनी बरुईपूर-जयनगर रस्त्यावर 'रास्ता रोको' आणि रेल्वे रुळांवर 'रेल रोको' आंदोलन केले.या आंदोलनादरम्यान लोकांनी काही संशयितांना पकडून मारहाण केली, ज्यामध्ये एका संशयित आरोपीचा मृत्यू झाला. मुलीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला होता.

# यांना आवर घालण्याची गरज! ट्रम्पनी मेलोनीना पुन्हा डिवचले

■ वॉशिंग्टन



**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्यावर पुन्हा एकदा निशाणा साधला आहे. त्यांनी 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक जुना फोटो शेअर केला आहे. या फोटोत मेलोनी त्यांच्याकडे हसतमुख चेहऱ्याने पाहात आहेत, असे दिसते. फोटोसोबत त्यांनी 'रिस्ट्रेनिंग ऑर्डर निडेड (थोडक्यात यांना आवर घालण्याची गरज) असे लिहिले आहे.

या फोटोमुळे गेल्या महिन्यात पार पडलेल्या 'जी-७' शिखर परिषदेनंतर, दोन्ही नेत्यांमध्ये सुरू झालेला वाद अद्यापही सुरूच असल्याचे दिसते. जी-७ परिषदेनंतर ट्रम्प यांच्या एका मेलोनी यांच्याबाबतच्या एका वक्तव्याने दोन्ही नेत्यांमध्ये वाद झाला होता. इटलीच्या पंतप्रधान मेलोनी आपल्याला वारंवार फोटो काढण्यासाठी विचारत होत्या आणि सोबत दिसण्यासाठी अत्यंत उत्सुक होत्या. मेलोनी यांनी छायाचित्रासाठी आपल्याकडे अक्षरशः भीक मागितली, असे ट्रम्प यांनी म्हटले होते. ट्रम्प यांच्या या वक्तव्याला मेलोनी यांनी तेवढेच तडफदार उत्तर दिले होते. त्या म्हणाल्या की, मी अथवा इटली कधीही कोणाकडे गयावया करत नाही. इटली सरकार आपले परराष्ट्र धोरण वैयक्तिक राजकीय कारणांवरून नाही, तर राष्ट्रीय हिताच्या आधारे ठरवते.

# दलाई लामांचा ९१ वा वाढदिवस तिबेटींकडून उत्साहात साजरा

■ धरमशाला

**हिमाचल** प्रदेशमधील तिबेटी समाजाने १४ व्या दलाई लामांचा ९१ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. चौदाव्या दलाई लामांचा जन्म ६ जुलै १९३५ रोजी तिबेटमध्ये झाला. गेल्या काही वर्षांपासून त्यांचे हिमाचल प्रदेशच्या धरमशालामध्ये वास्तव्य आहे. लडाखच्या लेहमधील शेवात्सेल टिचिंग ग्राऊंडवर वाढदिवसाचा मुख्य कार्यक्रम साजरा करण्यात आला. तर त्सुगलागखांग बौद्ध मठ आणि मॅकलिओडगंज येथे एकाच वेळी वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सेंट्रल तिबेटियन ॲडमिनिस्ट्रेशन येथील (सीटीए) वाढदिवसाच्या मुख्य कार्यक्रमामध्ये भारत आणि तिबेटच्या राष्ट्रगीतांचे गायन, वाढदिवसाचा केक कापणे आणि पारंपरिक सांस्कृतिक कलाविष्कार आदिंचा समावेश होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दलाई लामा यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना फोन करून शुभेच्छा दिल्या.

# वायनाडमध्ये पुन्हा भूस्खलन दोघांचा मृत्यू! आठ जखमी

■ वायनाड

**केरळमधील** वायनाड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे आज मोठी दुर्घटना घडली. मलप्पुरम आणि वायनाड जिल्ह्यांना जोडणाऱ्या अनाक्कमपोईल -मेप्पाडी बोगदा रस्ता प्रकल्पाच्या कामादरम्यान भूस्खलन झाले. यात दोन जणांचा मृत्यू झाला असून आठ जण जखमी झाले आहेत. ढिगाऱ्याखाली आणखी काही लोक अडकले आहेत.

कल्लाडी येथील मीनाक्षी पुलाजवळ बोगद्याचे काम सुरू असताना ही दुर्घटना घडली. भूस्खलन झाले तेव्हा घटनास्थळी अनेक बांधकाम कामगार काम करत होते. भूस्खलन झाल्याने काही वाहने आणि यंत्रसामग्रीही मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस, अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथके घटनास्थळी दाखल झाली.

# गृहनिर्माण सोसायटीच्या सर्व सदस्यांना आता समान शुल्क

**महाराष्ट्र शासनाची सुधारित नियमावली**

■ मुंबई

**राज्य** सरकारने गृहनिर्माण सोसायट्यांसाठी आता सुधारित नियमावली जाहीर केली असून, त्यानुसार आता सदनिकेच्या क्षेत्रफळावर आधारित न राहता सर्व सदस्यांना समान सेवा शुल्क भरावे लागणार आहे. तसेच,थकबाकीवरील दंडात्मक व्याजाचा दर वार्षिक १२ टक्क्यांपर्यंत कमी केला असून गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीची प्रक्रिया ३० दिवसांत पूर्ण करणे बंधनकारक केले आहे. गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये होणारे वाद मिटवण्यासाठी मेंटेनन्सच्या म्हणजेच देखभाल शुल्काच्या नियमांमध्ये मोठा बदल केला आहे. आता सोसायटीचा मेंटेनन्स हा दोन भागांत विभागला जाईल. पहिला भाग 'सेवा शुल्क' असेल, जो सर्वांसाठी समान असेल. यामध्ये सुरक्षारक्षक,सफाई कामगार आणि मॅनेजरचे पगार, लिफ्टची दुरुस्ती, तसेच जिना व पार्किंगमधील सामूहिक विजेचा खर्च समाविष्ट आहे. तुमचा फ्लॅट लहान असो वा मोठा, या सुविधा सर्वांसाठी सारख्याच असल्याने याचे बिल सर्वांना एकसारखेच येईल. दुसरा भाग 'इमारत निधी' चा असेल, जो फ्लॅटच्या आकारावर आधारित असेल. यामध्ये इमारतीचा दुरुस्ती निधी आणि भविष्यासाठीचा 'सिंकिंग फंड' यांचा समावेश होतो, त्यामुळे ज्यांचा फ्लॅट मोठा आहे, त्यांना हा खर्च चौरस फुटाच्या हिशोबाने जास्त द्यावा लागेल.

# न्यायालयीन दिरंगाई! वसईतील वकिलांचा सत्याग्रह

■ मुंबई

**न्यायालयीन** दिरंगाई व प्रशासकीय अपयशाच्या निषेधार्थ वसईतील वकिलांनी रविवारी सत्याग्रह आणि सविनय कायदेभंग आंदोलन केले. यासंदर्भात बार असोसिएशन ऑफ वसई व वसई ॲडव्होकेट्स असोसिएशने संयुक्त निवेदन जारी केले. त्यात न्यायालयीन दिरंगाईमुळे जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी होत चालला असून न्याय व्यवस्थेत मोठ्या सुधारणांची आवश्यकता आहे, असे या निवेदनात म्हटले.

वकिलांच्या संघटनांनी सांगितले की, न्यायालयीन दिरंगाईमुळे याचिकाकर्त्यांना वर्षानुवर्षे न्यायापासून वंचित रहावे लागते. वकिली व्यवसायावरही त्याचा प्रतिकूल परिणाम होतो.त्यामुळे आम्ही मुंबई उच्च न्यायालय, बार काउन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा, ठाणे जिल्ह्याचे मुख्य जिल्हा न्यायाधीशांना फेब्रुवारी, एप्रिल, मे आणि जूनमध्ये निवेदन सादर केली. मात्र कोणाहीकडून कसलाही प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे आम्ही सत्याग्रह आणि सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली. वकिलांच्या संघटनांनी एका खटल्याचा दाखला दिला. १९८५ मध्ये दाखल झालेल्या या खटल्याचा निकाल ४१ वर्षांनंतर यावर्षीच्या मे महिन्यात देण्यात आला. सुनावणीत ४१ वर्षे वाया गेल्यामुळे निकाल लागूनही संबंधितांना काहीही उपयोग होण्याची शक्यता नाही.कारण निकालाला वरीष्ठ न्यायालयात आव्हा न देण्याची सुविधा न्यायप्रक्रियेत आहे.

# ५ दिवसांतच बाबा बर्फानींचे हिमशिवलिंग विरघळले

**श्रीनगर** - अमरनाथ यात्रेला अवघे पाच दिवस झाले असतानाच पवित्र गुहेतील नैसर्गिक बाबा बर्फानींचे हिमशिवलिंग पूर्णपणे विरघळले. ३ जुलैपासून सुरू झालेल्या ५७ दिवसांच्या यात्रेदरम्यान शिवलिंग विरघळल्याने ३ लाखांहून अधिक भाविकांचे दर्शन बाकी राहिले आहे. भाविकांमध्ये चिंता व्यक्त होत असली, तरी प्रशासनाने यात्रा सुरूच असल्याचे स्पष्ट केले. हवामानातील बदल आणि वाढलेल्या तापमानामुळे हिमशिवलिंग लवकर वितळल्याचे मानले जात असून, यात्रा २८ ऑगस्टपर्यंत नियोजित वेळापत्रकानुसार सुरू राहणार आहे. यात्रेच्या पहिल्या चार दिवसांत सुमारे ८६ हजार भाविकांनी पवित्र गुहेत बाबा बर्फानींचे दर्शन घेतले असून, पाचव्या दिवशी हा आकडा एक लाखांच्या पुढे जाण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली होती.


**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळः विभागीय अभियंता (विद्युत), मुंबई प्रदेश किरोल रोड : विद्याविहार (पश्चिम) : मुंबई-४०० ०८६**

ई-मेल: deelectmbi@gmail.com फोन: ०२२-२५१३६३०३

क्र.राप/काअमुं/विअ(विद्युत)/ईनिविदा/४३२ दिनांक: ०७.०७.२०२६

**ई- निविदा सुचना क्रमांक ०५ सन २०२६-२७ (विद्युत)**

विभागीय अभियंता (विद्युत), रा.प. मुंबई प्रदेश, किरोल रोड, विद्याविहार (प) मुंबई-८६ दूरध्वनी क्र. २५१३६३०३ हे सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र राज्य यांचेकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडुन ई-निविदेकरीता मोहरबंद निविदा मागवित आहेत.

| ई क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १३१५१२१_१ | रा.प. रायगड विभागातील रामवाडी पेण येथे नव्याने बांधलेल्या आगारामध्ये अग्निशमन यंत्रणा बसविणे. (अग्निशामक विषयक काम, पी.ए. प्रणाली) | ६५१३७१६.०० |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| क्र. | महामंडळाचा टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | निविदा डाउनलोड व विक्री व तयार करणे | ०८/०७/२०२६ | ११.०० |
| २. | ऑनलाईन निविदा विक्री बंद करणे | १७/०७/२०२६ | ११.०० |
| ३. | तांत्रिक व वाणिज्य लिफाफा उघडणे, शक्य झाल्यास | १८/०७/२०२६ | ११.०० |
| ४. | देकार पुर्व बैठक | १३/०७/२०२६ | ११.०० |

टीपः- १. सर्व पात्र/इच्छुक निविदाकरांनी निविदा पत्रात डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या https://mahatenders.gov.in वर मदत घेणे आवश्यक आहे. तसेच महामंडळाच्या www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. २. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील सदर कामांची एक अथवा सर्व ई- निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

विभागीय अभियंता (विद्युत)
रा.प.मुंबई प्रदेश (कुर्ला)



**शुध्दीपत्रक क्र. १**

**( ई-निविदा सुचना क्र.०९ सन २०२६-२७)**

**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र. पवि/लेशा/निविदा/२४८८, दि. २६.०६.२०२६**

| कामाचे नांव :- | १. | Consultancy services for Feasibility Study cum DPR, Survey and Preparation of Land Plan including social, environmental and CCA mitigation study for widening to two lane with Paved Shoulders to various roads as per packages mentioned in Enclosure IV of TOR in the State of Maharashtra with financial aid of Multilateral Development Banks (Under EPC mode ) Pacakge No. 7 |
|---|---|---|
| | **प्रसिध्द झालेले** | **सुधारीत वाचावे** |
| 1. Download period of online Tender | Dt. 02.07.2026 to 09.07.2026 | Dt. 06.07.2026 to 13.07.2026 |
| 2. Last date and time for online raising of technical points for clarification | Online raising of technical points on or before date 06.07.2026 @11.00 Hrs. | Online raising of technical points on or before date 08.07.2026 @ 11.00 Hrs. |
| 3. Last date for receiving queries for prebid / Pre-proposal meeting (Prebid Meeting & Place) | In the Office of the Chief Engineer (Konkan) & Project Director (EAP) Konkan, Mumbai "Bandhkam Bhavan" 4th Floor, B-Wing, 25th Murzban Road, Fort, Mumbai-400001 on dated 06.07.2026 @ 12 Hrs. | In the Office of the Chief Engineer (Konkan) & Project Director (EAP) Konkan, Mumbai "Bandhkam Bhavan" 4th Floor, B-Wing, 25th Murzban Road, Fort, Mumbai- 400001 on dated 08.07.2026 @ 12 Hrs. |
| 4. E-Tender submission date and time, (Technical and Financial bid) | Dt. 09.07.2026 (Upto 15.00 Hrs) | Dt.13.07.2026 (Upto 15.00 Hrs) |
| 5. Last date of submission of Hard copy of Tender | Dt.13.07.2026 (Upto 15.00 Hrs) | Dt.15.07.2026 (Upto 15.00 Hrs) |
| 6. E-Tender Opening Date | Dt. 13.07.2026 at 15.00 Hrs. (if possible) in office of the Superintending Engineer, Raigad P. W.Circle, Konkan Bhavan, Navi Mumbai. | Dt. 15.07.2026 at 15.00 Hrs. (if possible ) in office of the Superintending Engineer, Raigad P.W.Circle, Konkan Bhavan, Navi Mumbai. |

(सदर निविदेसूचनेमध्ये अथवा निविदेत काही बदल होत असल्यास खालील संकेतस्थळांवर कळविण्यात येईल.)
१. http://mahatenders.gov.in

जा.क्र. साबांवि/पनवेल/ई-निविदा/२०२६/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल
दिनांक :-

सही/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

क्रमांक: आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी १५४५



**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**
**भिवंडी जि.ठाणे**

**ई-निविदा क्र.०१**

खालील कामे करण्याकरीता सक्षम ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| कामाचे स्वरूप | निविदेची रक्कम (अंदाजित) रुपये | निविदा पत्राची किंमत (रुपये) |
|---|---|---|
| जनसंपर्क विभागाकडील ई निविदा क्र.०१ सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात विविध कार्यक्रमाकरिता छपाई साहित्य पुरवठा करणे | ४० लक्ष | ६,०००/- |

सदर ई निविदा महानगरपालिका संकेत स्थळ **https://mahatenders.gov.in** वर दि. ०८/०७/२०२६ पासून ते दि. २२/०७/२०२६ पर्यंत उपलब्ध आहेत. आपली ई-निविदा वर नमूद केलेल्या तारखेच्या ०३.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावी.

सही/-
**(विक्रम द राडे)**
**उपायुक्त (मुख्यालय)**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

जा.क्र./ज.सं.वि./७३८
दि.०७/०७/२०२६



**कल्याण महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, कल्याण.**

**-: निविदा सुचना क्रमांक - ०२/२०२६-२७ :-**

कल्याण महानगर परिवहन महामंडळ लि. च्या विविध कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेची नियुक्ती करणे करिता ई-टेंडरिंगद्वारे (दोन लिफाफा) ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | निविदा सूचनेचा संदर्भ विषय | तपशिल |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| १ | कामाचे नांव | कल्याण महानगर परिवहन महामंडळ लि. च्या विविध कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेची नियुक्ती करणेबाबत. |
| २ | जी. एस. टी. सह निविदा प्रपत्राचे मुल्य रुपये | रुपये १७,७००/- (ना परतावा स्वरुपात) (अक्षरी - सतरा हजार सातशे मात्र) (जी. एस. टी. १८ टक्के सह) |
| ३ | निविदा अनामत रक्कम रुपये (.E.M.D.) | २,००,०००/- (अक्षरी-दोन लाख मात्र) |
| ४ | सुरक्षा अनामत रक्कम (.S.D.) (बँक गॅरन्टी स्वरुपात) रुपये | निविदा कालावधीतील एकूण देकार रक्कमेच्या ०५ टक्के इतक्या रकमेची राष्ट्रीयकृत बँकेची, निविदा कालावधी अधिक ०६ महिन्यांकरीता वैध असलेली बँक गॅरन्टी (सुरक्षा अनामत) |
| ५ | निविदा कामाचा कालावधी | ०४ महिने अधिक १८ महिने. |
| ६ | निविदेचा विधी ग्राह्य कालावधी | निविदा प्रसिध्दीच्या दिनांकापासून १८० दिवस. |

**-: अटी व शर्ती :-**

महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेत स्थळावर दिनांक ०८/०७/२०२६ ते दिनांक २८/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत निविदा फॉर्म विक्रीसाठी उपलब्ध असून ई-टेंडरिंगद्वारे निविदा अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक २८/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत राहील. तसेच, मुदतीत प्राप्त झालेल्या सर्व निविदांचा तांत्रिक देकार शक्य झाल्यास दिनांक ३०/०७/२०२६ रोजी दुपारी १६.०० वाजता उघडण्यात येईल.

इच्छुक निविदाकारांनी देकार भरतांना निविदा अनामत रक्कम (इसारा रक्कम /EMD) आणि देकार अर्जाची रक्कम ऑनलाईन भरल्या - बाबत पावतीची स्कॅन - कॉपी तांत्रिक देकारासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच, तांत्रिक देकारात नमुद केल्यानुसार सर्व दस्तऐवज स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे.

तसेच, शक्य झाल्यास विषयांकित निविदेची निविदापूर्व बैठक दिनांक १५/०७/२०२६ रोजी दुपारी १४.३० वाजता परिवहन मुख्य कार्यालय, कल्याण डोंबिवली महापालिकेसमोर, शंकरराव चौक, कल्याण (प.) येथे परिवहन व्यवस्थापक, कडोंमपा तथा संचालक व सचिव, केएमपीएमएल, यांचे दालनात घेण्यात येणार असून निविदापूर्व बैठकीतील इतिवृत्त हा मुळ निविदेचा भाग समजण्यात येईल. प्रकरणी प्राप्त झालेल्या निविदा कोणतेही कारण न देता स्विकारणे किंवा नाकारणे किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करणे याबाबतचा अधिकार संचालक तथा सचिव, यांनी राखून ठेवला आहे, याची इच्छुक निविदाकारांनी नोंद घ्यावी.

कडोंमपा/जसंवि/मुका/२५८
दिनांक :-०७/०७/२०२६

सही / -
**(डॉ. विजयकुमार द्वासे)**
**संचालक तथा सचिव**
कल्याण महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, कल्याण



**OFFICE OF THE CHIEF ENGINEER**
**Maharashtra-State Infrastructure Development Corporation Ltd.**
**(A Government of Maharashtra Undertaking)**
CIN-U43900MH2023 SGC412992
Head Office- B/13, 13th floor, Bakhtawar building, Nariman Point, Mumbai - 400021
Mail.id-ee.mumbai@msidc.org/ Ph.no 022-20822686 /022-20822687

**E-Tender Notice No. 06 (2026-2027)**

Office of the Chief Engineer, Maharashtra-State Infrastructure Development Corporation Limited (MSIDC Ltd.), Mumbai invites limited tender on Quality cum Cost Based Selection (QCBS) System basis from our empaneled Architects for the below mentioned work: -


| | |
|---|---|
| **Name of work** | **Appointment of Consultant for undertaking Architectural Consultancy Services for Prison / Jail at Mankhurd, Kurla and Staff Quarters along with ADG - Prisons Office at Turbhe Mandale Site in Mumbai.** |
| **SCOPE OF SERVICES** | ● Complete Architectural & Engineering Services (including Concept & Detailed Planning, Design & Estimation of Architecture, MEPF, Structural, HVAC and other allied services) & other Pre-Tender Services including 'Bid Process Management' till the appointment of contractor.<br>● Manage & Support in Shifting and Rehabilitation of PAPS. |
| **MINIMUM ELIGIBILITY** | - The Architectural Firm/Company must be in existence from minimum seven (7) years after registration in India as on due date of the tender.<br>- The Architect/ Consultant must be empaneled at MSIDC under **"Category- A or B"** of building works.<br>- Annual Turnover of **last financial year** should not be less than **INR 5.00 Crores**. |
| **Tender Document Fees** | INR 23,600/- (20,000/- + GST) [ to be paid online only]**<br>*[In words: Rupees Twenty-Three Thousand Six Hundred only]* |
| **EMD** | **Earnest Money Deposit:** INR 20,00,000/- (In words: Rupees Twenty Lakhs only); to be submitted online or physically in the form of bank guarantee in the prescribed format of the RFP. |
| **TECHNICAL EVALUATION CRITERIA** | (As per Annex-2) |
| **Performance Security** | **2% of the final contract amount** in the form of Bank Guarantee as per the prescribed format in Appendix-A. |
| **SELECTION METHODOLOGY** | Quality cum Cost Based Selection (QCBS-80:20) System:<br>- Where, Technical Weightage (T) and Financial Weightage (F) shall be 80% and 20% respectively.<br>- Formula of Selection is:<br>$S_F = Q_F + F_F$<br>where. $Q_F$ - Final Technical Score<br>$Q_F$ - Technical Score * 80/100<br>$F_F$ - Final Financial Score<br>$F_F$ - FC/FA* 20<br>$F_C$ - Lowest Financial Quote<br>$F_A$ - Financial Quote of the Bidder<br>(i) Criteria for Scoring/points shall be as per Annex-2.<br>(ii) Passing Score for Stage-1 shall be 75 out of 100 points.<br>(iii) The consultants passing Stage-1 (Technical Qualification) shall only be qualified for Stage-2 (Financial Qualification) qualification.<br>(iv) The **$S_1$ bidder** after the evaluation of Stage-1 and Stage-2 shall be appointed as the consultant for the subject work. |
| **TIMELINES** | 1. Date of Issue Tender Notice: 06/07/2026 at 15.00 Hrs.<br>2. Start Date for submission of Bids: **07/07/2026**; Time - 15.00 Hrs.<br>3. Last Date for submitting the Bids: **16/07/2026**; Time - 17.00 Hrs.<br>4. Date of Opening of technical bids: **17/07/2026** at 17.30 Hrs (if possible) |

| S. No. | List of works under this project | Site Area (acres) |
|---|---|---|
| 1 | Development of a High-Rise Prison at Mankhurd, Tal. Kurla, Mumbai. | 22.5 |
| 1.1 | Development of Staff Quarters and ADG-Prison Office at Turbhe Mandale, Mumbai. | 5 |

**Note:**
1. All interested bidders who want to participate in tendering process must be empaneled with MSIDC as an Architectural Firm under **"Category-A or B".**
2. All eligible bidders must visit "www.mahatenders.gov.in" for more details regarding the tender.
3. It is compulsory for all participants to submit their bid documents 'online' on or before the due date of this tender notice.
4. The above tender is on Quality cum Cost Based Selection, where technical weightage and financial weightage is 80% and 20% respectively (QCBS - 80:20)
5. No late submissions shall be entertained.
6. MSIDC reserves the right to reject any or all bid submissions without assigning any reasons thereof.

sd/-
No. MSIDC/Mumbai/Limited/Tender/ 07 /2026 **Chief Engineer,**
MSIDC, Mumbai. **Maharashtra-State Inrastructure Development**
Date: 02/07/2026 **Corporation Ltd., Mumbai.**

क्रमांकः आरओसी-२०२६-२७/ क्र.-५/सी १५५९



**अभिनेता** आणि लेखक अदिवी शेष आता तेलुगू चित्रपटसृष्टीच्या पलीकडे जाऊन हिंदी सिनेसृष्टीत आपले स्थान अधिक बळकट करण्यासाठी सज्ज झाला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, अदिवी शेष एका मोठ्या हिंदी ॲक्शन ड्रामा चित्रपटात मुख्य भूमिका साकारणार असून, २०२७ च्या सुरुवातीला या चित्रपटाचे चित्रीकरण म्हणजेच शूटिंग सुरू होण्याची दाट शक्यता आहे. गेल्या काही वर्षांत अदिवी शेषने व्यावसायिक मूल्य आणि दर्जेदार कथांचा मिलाफ असलेले चित्रपट देऊन स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. केवळ अभिनयच नाही, तर एक उत्तम लेखक म्हणूनही त्याने अनेक चित्रपटांच्या पटकथांवर काम केले आहे. २६/११ च्या मुंबई हल्ल्यातील शहीद मेजर संदीप उन्नीकृष्णन यांच्या जीवनावर आधारित 'मेजर' या चित्रपटातील त्याच्या अभिनयाचे हिंदीसह अनेक भाषांमध्ये कौतुक झाले होते. या चित्रपटामुळे त्याला पॅन इंडिया स्तरावर आणि विशेषतः हिंदी प्रेक्षकां मध्ये मोठी पसंती मिळाली.

## अदिवी शेष झळकणार ॲक्शनपटात

**बॉलिवूड** अभिनेत्री क्रिती सेनने तिच्या कारकिर्दीतील अत्यंत गाजलेल्या आणि कौतुक मिळालेल्या 'मिमी' या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान एक महत्त्वपूर्ण वैयक्तिक निर्णय घेतला होता. या चित्रपटासाठी वजन वाढवत असतानाच तिने 'एग फ्रीझिंग' प्रक्रिया करून घेतली होती, असा खुलासा तिने नुकताच एका मुलाखतीत केला आहे. हा निर्णय स्वतःला दिलेली एक सर्वोत्तम भेट होती, असे क्रितीचे म्हणणे आहे.

सरोगसी म्हणजेच भाडोत्री मातृत्व या विषयावर आधारित असलेल्या 'मिमी' चित्रपटासाठी क्रितीला प्रचंड तयारी करावी लागली होती. यामध्ये वजन वाढवण्याचाही समावेश होता. या प्रक्रियेदरम्यान तिला 'एग फ्रीझिंग'बद्दल माहिती मिळाली. या प्रक्रियेमुळे शरीरावर सूज येते आणि नेमके याच काळात चित्रपट सुरू होण्यापूर्वी वजन वाढवण्यासाठी तिच्याकडे दोन महिन्यांचा वेळ होता. त्यामुळे या वेळेचा हुशारीने वापर करत तिने ही प्रक्रिया पूर्ण करून घेतली.

या प्रक्रियेदरम्यान शरीरात मोठ्या प्रमाणावर हार्मोनल बदल होत असल्याने मानसिक आणि भावनिक चढ-उतारांचा सामना करावा लागल्याचेही तिने प्रांजळपणे कबूल केले.




**बॉलिवूडचे** शहेनशहा अमिताभ बच्चन यांनी आपल्या अधिकृत ब्लॉगवर वाढत्या तंत्रज्ञानाच्या युगात मानवामध्ये निर्माण झालेल्या 'प्रोक्रेस्टिनेशन' म्हणजेच कामात दिरंगाई किंवा टाळाटाळ करण्याच्या प्रवृत्तीवर अत्यंत मार्मिक भाष्य केले आहे. ८३ वर्षीय महानायकाने आपल्या लेखनातून उद्या कधीच येत नाही, या जुन्या म्हणीची सर्वांना आठवण करून दिली आहे.

अमिताभ बच्चन यांनी मानवी मेंदूची तुलना एका तुडुंब भरलेल्या डेटा बँकशी केली आहे. ते लिहितात, आजच्या काळात मानवी मेंदू हे माहितीचे एक संपृक्त केंद्र बनले आहे. आपल्याला खूप काही गोळा करायचे असते, शिकायचे असते आणि करायचेही असते. मात्र, यासाठी आवश्यक असणारा वेळ 'उद्या करूया' या एकाच विचाराने हातातून निसटून जातो. पण तो उद्या) कधीच येत नाही! जेव्हा तो दिवस उजाडतो, तेव्हा लक्षात येते की जे काम आपण उद्यावर ढकलले होते, ते पूर्णच झाले नाही!!

त्यांनी पुढे नमूद केले की, सध्याच्या 'इन्फर्मेशन मशिनरी'ने मानवाच्या नैसर्गिक प्रक्रियेवर पूर्णपणे मात केली आहे. प्रत्येक क्षणाला आपल्यासमोर एक नवीन दृष्टिकोन, एक नवीन शिकवण येत असते. या अथांग माहितीच्या महापुरातून नक्की किती गोष्टी आत्मसात करायच्या, हा मोठा प्रश्न आहे. यावर नेमका उपाय काय? याबद्दल मला स्वतःलाही कोणतीही कल्पना नाही, अशी प्रांजळ कबुलीही त्यांनी दिली आहे.




**अभिनेत्री** राणी मुखर्जी हिने तिच्या 'मर्दानी ३' या चित्रपटाच्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरच्या निमित्ताने चित्रीकरणादरम्यानच्या आव्हानात्मक आठवणींना उजाळा दिला आहे. चित्रपटाच्या क्लायमॅक्समधील म्हणजेच अंतिम टप्प्यातील महत्त्वाच्या ॲक्शन दृश्यांसाठी संपूर्ण टीमने सलग १८ तास काम केले होते. हे चित्रीकरण दुपारी ३ वाजता सुरू होऊन दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजेपर्यंत चालले होते, ज्यासाठी

राणीला मोठ्या शारीरिक कष्टांना सामोरे जावे लागले.राणी मुखर्जीने सांगितले की, मी वैयक्तिक आयुष्यात सकाळी लवकर उठणारी व्यक्ती आहे. त्यामुळे रात्रीच्या सत्रात काम करताना मला शरीराचे घड्याळ पूर्णपणे बदलावे लागले. हे माझ्यासाठी मोठे आव्हान होते. असे असले तरी, संपूर्ण शहर झोपलेले असताना चित्रपट क्षेत्रातील तंत्रज्ञ आणि कलाकार एकत्र येऊन जी ऊर्जा निर्माण करतात, ती खूप वेगळी असते आणि शांत वातावरणामुळे कामावर अधिक लक्ष केंद्रित करता आले, असेही तिने नमूद केले. दरम्यान, 'यशराज फिल्म्स' निर्मित आणि अभिराज मिनावाला दिग्दर्शित या चित्रपटात राणी मुखर्जी पुन्हा एकदा 'शिवानी शिवाजी रॉय' या डॅशिंग पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे.




भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुली याच्या जीवनावर आधारित 'दादा - द सौरव गांगुली स्टोरी' या बहुप्रतिक्षित बायोपिकबद्दल प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. सूत्रांकडून मिळालेल्या ताज्या माहितीनुसार, सौरव गांगुलीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून निर्माते ८ जुलै रोजी या चित्रपटाची पहिली झलक प्रदर्शित करण्याची शक्यता आहे.

या क्रीडाविषयक चरित्रपटात राष्ट्रीय पुरस्कार विजेता अभिनेता राजकुमार राव हा मुख्य भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटाची अधिकृत घोषणा झाल्यापासूनच या प्रकल्पाविषयी क्रीडा आणि चित्रपट जगतात मोठी चर्चा रंगली आहे. चित्रपटाच्या निर्मितीशी संबंधित सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या चित्रपटाचे चित्रीकरण म्हणजेच शूटिंग चालू वर्षाच्या एप्रिल महिन्यात सुरू झाले असून गेल्या तीन महिन्यांपासून ते वेगात सुरू आहे. सौरव गांगुलीचा भारतीय क्रिकेटमधील प्रवास, त्याचे आक्रमक नेतृत्व आणि भारतीय संघात त्याने निर्माण केलेले नवे चैतन्य हा क्रिकेट इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय मानला जातो. त्यामुळे राजकुमार राव पडद्यावर ही भूमिका कशी साकारणार आणि त्याचा लुक कसा असेल, याबद्दल प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता आहे.






अभिनेत्री नेहा धुपिया हिने तिच्या कारकिर्दीत एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. तिचा पहिला आंतरराष्ट्रीय चित्रपट '५२ ब्लू' हा लंडन इंडियन फिल्म फेस्टिव्हल म्हणजेच लंडन भारतीय चित्रपट महोत्सवाचा उद्घाटनाचा चित्रपट ठरला आहे. ९ जुलै रोजी प्रसिद्ध बीएफआय साउथबँक येथे या चित्रपटाचा युरोपीय प्रीमियर रंगणार असून या महोत्सवाची सुरुवात या चित्रपटाने होईल. या चित्रपटातील नेहा धुपियाचा वेगळा लूक आणि तिचा दमदार अभिनय यासाठी आधीच तिचे भरभरून कौतुक होत आहे. या भावूक कथेला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याने या वर्षीच्या महोत्सवातील हा सर्वात बहुप्रतिक्षित चित्रपट मानला जात आहे.

या चित्रपटाची आणखी एक मोठी जमेची बाजू म्हणजे जगातील आघाडीचा फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी हा देखील या चित्रपटाशी जोडला गेला आहे. मेस्सीच्या सहभागामुळे या चित्रपटाला आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठी प्रसिद्धी मिळत आहे. या भव्य प्रीमियरसाठी नेहा धुपियासोबतच प्रसिद्ध अभिनेते आदिल हुसेन आणि चित्रपटातील इतर कलाकार लंडनला उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याला जगभरातील चित्रपटप्रेमी आणि सिनेसृष्टीतील दिग्गजांची उपस्थिती लाभणार आहे.

## नेहा धुपियासाठी वैश्विक पर्वणी



# मुंबईत पाणी ओसरताच पवईत मगरीची सुटका

■ मुंबई

**गेल्या** दोन दिवसांच्या मुसळधार पावसानंतर मुंबईतील अनेक भागांतील पाणी ओसरत असतानाच पवई परिसरात एका गाडीमागे महाकाय मगर आढळल्याने खळबळ उडाली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होताच मुंबई महानगरपालिका आणि वन विभागाने तातडीने कारवाई करत मगरीची सुखरूप सुटका केली.

एका नागरिकाने एक्सवर मगरीचा व्हिडिओ पोस्ट करत संबंधित पालिका यंत्रणांना टॅग केले. त्यानंतर पालिकेने नागरिकाकडून मगरीचे नेमके ठिकाण मागवले आणि वनविभागाशी समन्वय साधून तातडीने बचाव मोहीम राबवली. काही वेळाच्या प्रयत्नांनंतर संबंधित अधिकाऱ्यांनी मगरीला सुरक्षितपणे पकडून परिसरातून हलवले. वन्यजीव तज्ज्ञांच्या मते, पवई तलाव आणि आसपासच्या जलस्त्रोतांमध्ये मगरींचा नैसर्गिक अधिवास आहे.

# मनोरी समुद्र किनारपट्टीजवळ मालवाहू जहाज अडकले

■ मुंबई

**मुसळधार** पाऊस, सोसाट्याचे वारे आणि खवळलेल्या समुद्रामुळे निकाराग्वा देशाचे 'एमटी अल जाफझिया' हे मालवाहू जहाज मुंबईतील मनोरी समुद्रकिनाऱ्याजवळ खडकावर अडकले आहे. सुदैवाने, हे जहाज मानवरहित आहे. सध्या भारतीय तटरक्षक दल आणि नौदल घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थितीवर करडी नजर ठेवून आहेत.

हे भरकटलेले मालवाहू जहाज मनोरी किनाऱ्यापासून साधारण १ किलोमीटर अंतरावर खडकावर अडकले आहे. गोराई पोलिसांनी तत्काळ माहिती दिल्यानंतर भारतीय तटरक्षक दल आणि नौदल घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थितीवर करडी नजर ठेवून आहे. समुद्रात ताशी ८० ते ९० किमी वेगाने वारे वाहत असल्याने व किनारा खडकाळ असल्यामुळे लहान बोटींच्या सहाय्याने मदतकार्य करणे अत्यंत धोकादायक ठरत आहे.

### तटरक्षक, नौदल करडी नजर ठेवून



एका निवेदनात, तटरक्षक दलाने म्हटले आहे की,खराब हवामानामुळे एमटी अस्फाल्ट स्टार, एमटी स्टेलर रुबी आणि एमटी अल जाफझिया ही जहाजे भरकटली असल्याबाबत ५ जुलै रोजी तटरक्षक दलाला माहिती मिळाली होती. त्यामुळे परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि जहाजांना आवश्यक ती मदत पुरवण्यासाठी आयसीजीएस सम्राटला त्या भागात वळवण्यात आले. त्याचवेळी, मदत पुरवण्यासाठी ईटीव्ही वॉटर लिली तैनात करण्याची विनंती डीजी शिपिंगला करण्यात आली. त्यानंतर एमटी अस्फाल्ट स्टार आणि एमटी स्टेलर रुबी ही दोन जहाजे सुरक्षित ठिकाणी नांगरण्यात आले. मात्र एमटी अल जाफझिया हे जहाज अद्याप समुद्रातील खडकाळ भागात अडकून पडले आहे. हे जहाज निकाराग्वा देशाचे असून त्याची लांबी १८२.७५ मीटर आणि रुंदी ३२.२६ मीटर इतकी आहे.

# पावसामुळे पुणे आरटीओतील दैनंदिन कामे लांबणीवर पडणार

■ पुणे

**सध्या** कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे पुणे आणि पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयातील दैनंदिन कामकाज काही काळासाठी पुढे ढकलण्यात आले आहे. यामध्ये पक्क्या वाहन परवान्यांसाठी मंचर येथे घेण्यात येणारे शिबिर आता शुक्रवार १० जुलैला घेण्यात येणार आहे.

या पावसामुळे काल योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी आलेल्या वाहनांची कामे संबंधित अधिकाऱ्यांच्या दैनंदिन क्षमतेनुसार पुढील ७ ते १० दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहेत. काल आयडीटीआर येथील वाहनचालक चाचणी, शिकाऊ वाहन चालवण्याच्या परवाना चाचणीसाठी उपस्थित राहू न शकलेल्या अर्जदारांनी आपली अपॉइंटमेंट सोयीनुसार किंवा येत्या दहा दिवसांत बदलून घेण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी केले आहे. चारचाकी वाहनांच्या नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी डिमांड ड्राफ्ट जमा करण्याची मुदत मंगळवारी ७ जुलै दुपारी अडीच वाजेपर्यंत वाढविण्यात आली.

# मुसळधार पावसाने शहापुरातील नद्या नाले भरले! रस्ते पाण्याखाली

■ शहापूर

**गेल्या** चोवीस तासांपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसाने शहापूर तालुक्याला अक्षरशः झोडपून काढले आहे. नदी-नाले दुथडी भरून वाहत असून अनेक रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहतूक विस्कळीत झाली आहे. सखल भागांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या जोरदार पावसामुळे सापगावजवळील भातसा नदी धोकादायक पातळीवरून वाहत आहे. प्रशासनाने नदीवरील पुलांवर खबरदारी घेत आजूबाजूच्या गावांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

सुरक्षेच्या कारणास्तव चिंतामणी मेंडोस संकुल ते महिला मंडळ शाळा व ग.वि. खाडे विद्यालय मैदानाकडे जाणारा रस्ता तात्पुरता बंद करण्यात आला आहे. शालेय विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन शहापूर नगरपंचायत प्रशासनाने केले आहे.

शहापूर पंचायत समितीजवळील मराठा खानावळ परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने रहिवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. तावडेनगर येथील अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी घुसल्याने संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे.



खवळलेल्या समुद्राने शिवाजी पार्क किनाऱ्यावर मुंबईकरांना प्लास्टिकचा कचरा व्याजासह परत केला. (छाया : दीपक साळवी)

# हर्णेत खड्ड्यांचा सापळा महावितरणमुळे रस्ता जीवघेणा

■ हर्णे

**महावितरणच्या** खाणकामानंतर हर्णेचा मुख्य रस्ता खड्ड्यांच्या विळख्यात! पावसात पाणी साचल्याने अपघातांचा धोका वाढला. विद्यार्थी, वाहनचालक आणि नागरिकांचे हाल प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करावी, अशी ग्रामस्थांची जोरदार मागणी.


दापोली तालुक्यातील हर्णे एस.टी. स्टँडसमोरील मुख्य रस्त्यावर महावितरणकडून भूमिगत वीज केबल टाकण्यासाठी करण्यात आलेल्या खणकामानंतर रस्त्याची योग्य दुरुस्ती न झाल्याने संपूर्ण मार्ग खड्ड्यांच्या विळख्यात सापडला आहे. मुसळधार पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने रस्ता अक्षरशः अपघातांचा सापळा बनला असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. सुमारे चार फूट खोल खणकाम करून काम पूर्ण करण्यात आले. मात्र त्यानंतर रस्त्याचे मजबुतीकरण किंवा डांबरीकरण न केल्याने सर्वत्र मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत.

# बारवी धरणाच्या पाणीसाठ्याने ३० टक्क्यांचा टप्पा ओलांडला

■ ठाणे

**मुंबई,** ठाणे आणि आजूबाजूच्या परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या बारवी धरणातील पाणीसाठ्यात दमदार पावसामुळे वेगाने वाढ होत आहे. या धरणातील पाणीसाठ्याने ३० टक्क्यांचा टप्पा ओलांडला आहे. तरीही हा पाणीसाठा गेल्यावर्षीच्या तुलनेत निम्म्याने कमी आहे.

बारवी धरणाची पाणीपातळी काल सकाळी ६०.१८ मीटर इतकी नोंदविली गेली. धरणाची कमाल ओव्हरफ्लो पातळी ७२.६० मीटर आहे.त्यामुळे ओव्हरफ्लो होण्यासाठी अजूनही १२.४२ मीटर पाण्याची गरज आहे. काल बारवीच्या पाणलोट क्षेत्रात चांगला पाऊस झाला. परिसरात सरासरी १५७.४० मिमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे धरणातील उपयुक्त पाणीसाठा १०१.८ दशलक्ष घनमीटरवर पोहोचला आहे. सध्या धरण ३०.०६ टक्के भरले आहे. या हंगामात आतापर्यंत एकूण ६२८ मिमी पाऊस झाला आहे. मात्र गेल्यावर्षीच्या तुलनेत ही आकडेवारी



अत्यंत कमी आहे. गेल्यावर्षी याच दिवशी म्हणजे ६ जुलै रोजी बारवीची पातळी ६७.८० मीटर होती. त्यावेळी उपयुक्त साठा २१५.२८ दशलक्ष घनमीटर म्हणजे ६३.५३ टक्के होता. गेल्या वर्षी या काळापर्यंत १४१७.० मिमी पाऊस पडला होता. यंदा पाऊस ७८९ मिमीने कमी झाला आहे आणि पाणीसाठ्यात १३.४० दशलक्ष घनमीटरची घट झाली आहे.

# ठाण्याचा घोडबंदर परिसर साडेपाच तास अंधारात

**ठाणे** - मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे आज पहाटे घोडबंदर परिसरातील कसरवडवली आणि आनंदनगर भागातील वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. पहाटे ४ वाजताच्या सुमारास खंडित झालेला वीजपुरवठा तब्बल साडेपाच तासांनंतर, सकाळी साडेनऊच्या सुमारास पूर्ववत झाला. वीजपुरवठा खंडित झाल्याचा फटका पाणीपुरवठ्यावरही बसला. या भागात आधीच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक त्रस्त होते. त्यात वीज नसल्याने इमारतींमधील विद्युत पंप बंद पडले आणि अनेक ठिकाणी पाणीपुरवठाही ठप्प झाला. तसेच लिफ्ट सेवा विस्कळीत झाली .

# कोल्हापूर जिल्ह्यातील तब्बल ५४ बंधारे पाण्याखाली गेले

■ कोल्हापूर


**मागील** पाच दिवसांपासून कोल्हापूर जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला आहे. पावसामुळे जिल्ह्यातील ५४ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.यासह १८ मार्गांवरील थेट वाहतूक बंद झाली आहे. ही वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. परिणामी जिल्ह्यातील २५० पेक्षा जास्त गावांतील दळणवळण विस्कळीत झाले आहे.

जिल्ह्यात मुसळधार पावसाचे धूमशान सुरू असल्याने सर्वच नद्यांना पूर आला असून पाणी पातळीत वाढ सुरूच आहे. यामुळे २९९ बंधाऱ्यांपैकी ५४ बंधारे सोमवारी सायंकाळी चार वाजेपर्यंत पाण्याखाली गेले होते. यामुळे या बंधाऱ्यावरून होणारी सर्व प्रकारची वाहतूक बंदच आहे.

परिसरातील गावांची कनेक्टिव्हिटी पूर्णपणे तुटली आहे. परिणामी दुसऱ्या मार्गाने काही अंतराचा फेरा मारून वाहनधारकांची ये-जा सुरू आहे. पाण्याखाली गेलेल्या बंधाऱ्यांसह जिल्ह्यातील ३ राज्य, ५ प्रमुख जिल्हा मार्ग, ८ ग्रामीण मार्ग आणि २ इतर जिल्हा मार्ग असे एकूण १८ मार्ग बाधित झाले आहेत.या मार्गावर काही ठिकाणी पाणी असल्याने त्यावरील वाहतूक बंद असून ती पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे.

### १८ मार्गांवरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली

# नवाकाळ शब्दकोडे-१६६०



**आडवे शब्द –**

२. कपोत, कबूतर ४. करंजी ७. मार्गातील अडचण दूर करणे, शत्रूचा बीमोड करणे १०. जाणूनबुजून १२. दादागिरी १३. भीतीदायक १६. गोणपाट १७. ठसा, प्रभाव १८. छोटी पळी २०. बैरागी २१. दुही, फाटाफूट २२. छाया, सावली २४. कपाळाची जखम २५. आई, माता २७. श्रीराम २८. थंडीचा जोर २९. जोराचे भांडण ३२. उपस्थित ३३. मूर्ती वगैरेसाठीची माती ३४. चामखीळ ३३. तोंडदेखले ३९. विष्णूची पत्नी ४२. खास पाहुणचार ४५. भगवान शंकर ४६. एक हलके धान्य, सातू ४७. शेजारी ४९. टिंगल ५०. धार्मिक व्रत ५३. कारकून ५४. बेचव, शुष्क ५६. अफवा, कंडी ५७. सिंह ६०. सुंठीचे पूर्वरूप ६१. कुशल ६२. श्रमिक ६४. निर्णय, फैसला ६५. हंस पक्षी ६८. ओझे, भार ६९. एक शेंगभाजी ७०. मोठा भाऊ ७१. सहा महिन्यातून एखादे वेळी ७४. मुस्लिम बैरागी ७६. अर्धवट शिजलेले, नीट चावता न येणारे अन्न ७७. चिंता, घोर ७८. तोंडवळा, चेहरामोहरा ८१. दिखाऊपणा, पोकळ डामडौल ८४. गुरांचे अन्न, चारा ८५. मनातली गोष्ट ओळखणारा ८६. कैवार ८८. उपस्थित ९०. महाभारतात जरासंधाची राजधानी ९१. राघू, पोपट ९२. सरबराई ९४. पृथ्वी, वसुंधरा ९६. फिर्याद ९७. काव्य करणारा ९९. गणती, गणना १०१. जनानखाना, अंतःपुर १०२. एक खाद्यतेल/पालेभाजी १०४. एजंट १०५. हस्तभूषणांचा जाड प्रकार १०६. धावण्याची स्पर्धा

**उभे शब्द –**

१. निमंत्रितांनी यजमानांना दिलेली भेटवस्तू २. साखरेचा रस ३. वितरण ४. अतिशय श्रम ५. जवळ, समीप ६. प्राप्ती, फायदा ७. श्रवणेंद्रिय, कर्ण ८. नोटा छापण्याचे ठिकाण ९. शैली, धाटणी १०. अविरत, नित्य ११. टंचाई १४. रात्र, रजनी १५. कौशल्य १७. सिंहाचा बच्चा १९. भाडेकरार २१. घरदार नसलेला २३. फळाच्या अपेक्षेने केलेले सत्कर्म २४. अडथळा २६. मीठ, लवण २७. घेवडा २८. कार्ल्याची चव ३०. मिठी ३१. साजूक तुपाचे एक वैशिष्ट्य ३२. गहाळ झालेले ३३. वाघ ३५. उंचवटे किंवा खाचखळगे नसलेला समतल पृष्ठभाग ३७. कर्मचाऱ्याने मागितलेली सुट्टी ३८. रुची, आवड ४०. अग्नी ४१. पूर्वज ४३. अस्वस्थता ४४. आवाज, ध्वनी ४६. वीज बनवण्याचे उपकरण, जनरेटर ४८. शत्रूवर छुपा हल्ला करणारा ५१. कर्ज देणारा, धनको ५२. गुरांचे अन्न ५५. बोध, आकलन ५८. दमयंतीचा पती ५९. लांब पल्ल्याची तलवार ६०. सुस्ती ६१. चौकोन, चौरस किंवा आयताची लांबी व रुंदी यांचा गुणाकार ६३. इंग्रजी सहावा महिना ६४. आश्रयस्थान ६६. बेशिस्त, अजागळ ६७. चंद्र ६८. वारंवार, पुन्हा पुन्हा ७०. आकस बाळगणे ७२. समीक्षक ७३. भूतपूर्व, होऊन गेलेला ७५. भेग, फट ७९. मारला गेलेला ८०. विनवणी, आर्जवे ८२. अंगीकार, स्वीकार ८३. मुकुट ८४. गोंगाट, गर्दी ८५. कॉफीचा कप ८६. खाऊन संपवणे ८९. मधुर ९०. झकास, उत्तम ९१. देवयानीचा पिता, राक्षसांचा गुरू ९२. सूड ९३. बायको ९५. निमगोरा ९८. बांगड्यांसाठी मनगटाचे माप ९९. संधी १००. रसिकांचा प्रतिसाद १०१. खरबरीत १०३. मुस्लिमांचा मोठा सण •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६५९ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. तपमापक ५. विराट ९. रोहित्र ११. झुरळ १२. कडका १३. ओबडधोबड १५. बेट १६. सपक १७. उगवती १८. रग २०. माफक २१. कापड २२. वन २४. तीरकामठा २६. मिठागर २७. लालिमा २८. प्रलोभन ३०. फटका ३२. तर्क ३३. मावशी ३५. मुसमुसणे ३७. धडपड ३९. उडी ४०. सख्य ४१. जग ४२. ऐरावत ४३. कष्टप्रद ४५. किंवा ४६. परात ४७. वनमाळी ४९. घारगे ५१. दिनांक ५२. धैर्यवान ५४. वात ५५. रूढ ५७. डबोले ६०. तळीराम ६३. गर्व ६५. रकमाला ६८. क्षीण ६९. खळबळ ७१. पुन्हा पुन्हा ७३. रुचकर ७५. करवत ७७. रणनीती ७९. किळस ८०. राघव ८२. मस्का ८३. मदत ८६. मित ८७. उदरभरण ८९. केसरी ९०. कासव ९२. शांत ९४. खाडी ९५. रात ९७. भाऊ ९८. अत्तर ९९. भाकरी फिरवणे १००. मोहन

**उभे शब्द :** १. तरट २. पळ ३. पकपक ४. कडक ६. राजगड ७. लांब ८. अधोगती ९. रोड १०. त्रस्त ११. झुबे १३. ओतीव लोखंड १४. डर १६. सफर १७. उपमा १९. कामदेव २०. मागमूस २१. कालिका २३. नभ २५. रक्षा २६. मिठी २७. लाटणे २९. नतद्रष्ट ३०. फसगत ३१. खांडववन ३३. माडी ३४. शीलवान ३५. मुख्य ३६. मुजरा ३७. धरा ३८. पतन ३९. उदर ४०. सदोदित ४२. ऐश्वर्य ४३. कळी ४४. प्रघात ४६. पकड ४८. मासोळी ५०. गेरू ५३. वासा ५४. वाम ५६. ढगळ ५८. बोरन्हाण ५९. लेक ६०. तण ६१. रामरस ६२. जाळ ६४. कान्हा ६६. मारुती ६७. लाच ६८. क्षीर ६९. खतरा ७०. बल्लव ७१. पुडा ७२. पुरस्कार ७४. कर्बोदके ७५. कळक ७६. साद्यंत ७८. नीहार ८१. घण ८२. मदमत्त ८४. तसवीर ८५. बिस ८६. मितभाषी ८८. भय ९०. काडी ९१. वराह ९३. पारी ९४. खाणे ९६. तन

# शरद पवार यांचे पुन्हा धक्कादायक राजकारण

पान १ वरून

नागपुरात माध्यमांशी बोलताना शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे किमान ५ खासदार आमच्या पक्षात (राष्ट्रवादी अजित पवार गट) येऊ शकतात. येत्या १२ डिसेंबरपर्यंत या खासदारांचा प्रवेश सोहळा होऊ शकतो, असे म्हटले होते.

शरद पवार गट एनडीएमध्ये जाणार असल्याच्या चर्चांबाबत आ. रोहित पवार यांना विचारले असता त्यांनी ही शक्यता स्पष्ट फेटाळून लावली. ते म्हणाले की, अशी फक्त चर्चा सुरू आहे. मात्र त्यात कुठलेही तथ्य नाही. आमची केंद्रात कोणत्याही एनडीएच्या नेत्यासोबतही चर्चा सुरू नाही. राज्यातही कोणासोबत चर्चा चालू नाही. काँग्रेसच्या नेत्यांसोबतही चर्चा सुरू नाही. आम्ही विरोधातील पक्ष, पुरोगामी विचारांचा पक्ष, शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांचा पक्ष म्हणून पवारसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली गेली ६० वर्षे भाजपाच्या विचारांच्या विरोधात लढत आहोत. आम्ही फक्त महाराष्ट्र धर्म आणि सर्वसामान्यांची भूमिका मांडत आहोत. आम्ही विरोधी पक्ष म्हणून सामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न असेच मांडत राहू.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार मात्र यावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, चर्चा करण्याला अर्थ नाही. पण चर्चा सुरू आहे एवढे मात्र नक्की आहे. आता त्यांना कोणता रस्ता सोयीस्कर ठरतो हे त्यांनी ठरवायचे आहे. वैचारिक की सत्तेचा? सत्ता हवी आहे की पुरोगामी महाराष्ट्राचे पुरोगामित्व सांभाळून छत्रपती शिवरायांच्या, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, आई सावित्रीबाई फुले यांच्या विचारांवर विश्वास ठेवायचा आहे, की धन, संपत्ती आणि सत्ता मंत्री यावर विश्वास ठेऊन काम करायचे आहे, याचा संबंध त्यांच्याशी आहे. त्यावर मी भाष्य करायची गरज नाही.

ठाकरे गटाला एकाकी पाडण्याची ही शरद पवारांची ही खेळी असल्याचीही चर्चा होत आहे. मात्र, ठाकरे गटाकडून याबाबतीत कुठलीही प्रतिक्रिया आली नाही. अजित पवार हयात असताना दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणाची जोरदार चर्चा रंगली होती. राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आले असते, तर ते एनडीएसोबत राहणार की इंडिया आघाडीसोबत, हा प्रश्न अजित पवारांच्या अपघाती निधनामुळे कायमचा अनुत्तरित राहिला. मात्र, आता जयंत पाटील आणि विनोद तावडे यांच्यात झालेल्या बैठकीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला कोणती नवीन कलाटणी मिळते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, नर्मदा प्रकल्पाच्या बैठकीसाठी दिल्लीत आलेले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याविषयी म्हणाले की, महाराष्ट्रातून कोणत्याच नव्या पक्षाला एनडीएत प्रवेश दिला जाणार नाही. शरद पवार यांच्या पक्षाचे आमदार, खासदार आम्ही फोडणार नाहीत.

## पवारांचे चक्रावणारे राजकारण

शरद पवार यांचे राजकारण भल्याभल्यांना उमगत नाही, असे म्हटले जाते. कारण शरद पवार यांनी आपल्या चार दशकांच्या राजकीय कारकिर्दीत अनेकदा चकीत करणाऱ्या भूमिका घेतल्या आहेत. काँग्रेसमधून आपल्या राजकारणाची सुरुवात करणारे शरद पवार १९७८ मध्ये राज्यातील वसंतदादा पाटील यांच्या सरकारमधून ४० आमदारांसह बाहेर पडले होते. त्यानंतर पुरोगामी लोकशाही दल (पुलोद)ची स्थापन करून ते महाराष्ट्राचे सगळ्यात तरुण मुख्यमंत्री बनले. यावेळी वसंतदादा पाटील खंजीर खुपसण्याचा आरोप त्यांच्यावर झाला होता. शरद पवार यांनी काँग्रेस एस स्थापन करून काँग्रेसशी फारकत घेतली. १९८६ मध्ये राजीव गांधी पंतप्रधान असताना ते पुन्हा काँग्रेसमध्ये आले. मात्र, १९९९ मध्ये सोनिया गांधी यांच्या विदेशी मुळाचा उपस्थित करत पुन्हा काँग्रेसमधून बाहेर पडून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्यानंतर राष्ट्रवादी आणि काँग्रेसने स्वतंत्र निवडणुका लढवल्या. मात्र, नंतर दोन्ही पक्षांनी आघाडी करून सत्ता स्थापन केली. एवढेच नव्हे तर राष्ट्रवादी पक्ष काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीच्या दिल्लीतील सरकारमध्येही सामील झाला. २०१४ च्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत भाजपा-शिवसेनेला बहुमत मिळाले होते. त्यावेळी दोन्ही पक्षांत खातेवाटपावरून तणाव सुरु असताना शरद पवार यांनी भाजपाला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला होता. २०१९च्या निवडणुकीनंतर काँग्रेस आणि शिवसेनेसोबत महाविकास आघाडी स्थापन करून राष्ट्रवादी पक्ष उद्धव ठाकरे यांच्या सरकारमध्ये सहभागी झाला.

# वसईकर पुराच्या पाण्यात अडकले

पान १ वरून

सखल भाग जलमय झाले असून घरे, सोसायट्या, दुकाने आणि रस्त्यांमध्ये पाणी शिरले आहे. या पूरस्थितीचा सर्वाधिक फटका वीज यंत्रणेला बसला आहे. वसई पश्चिमेतील सनसिटी येथील महावितरणचे मुख्य उपकेंद्र पाण्याखाली गेले असून, शहरातील अनेक रोहित्रे, वीज वितरण पेट्या आणि भूमिगत केबल्स पाण्यात बुडाल्या आहेत. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वीजवाहिन्या तुटल्या असून, काही ठिकाणी रोहित्रांमध्ये बिघाड झाला आहे. महावितरणने खबरदारीचा उपाय म्हणून अनेक भागांतील वीजपुरवठा बंद ठेवला आहे. परिणामी नागरिकांना ४० तासांहून अधिक काळ अंधारात राहावे लागत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने मोबाईल टॉवरही बंद पडले असून, मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट सेवा कोलमडली आहे. वर्क फ्रॉम होम करणारे कर्मचारी, ऑनलाईन व्यवसाय करणारे तसेच विद्यार्थ्यांचे काम पूर्णपणे ठप्प झाले आहे. वीज नसल्याने इमारतींवरील पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी चढवता येत नसल्याने पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक सोसायट्यांमध्ये पाण्याचा साठा संपत आल्याने नागरिकांची गैरसोय वाढली आहे. पूरस्थितीमुळे दूध वाहतूक करणारी वाहने अनेक भागांत पोहोचू शकलेली नाहीत. त्यामुळे दूध, भाजीपाला आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला असून, नागरिकांना अत्यावश्यक वस्तूंसाठीही मोठी धावपळ करावी लागत आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये अजूनही पाणी साचून असल्याने त्यातून दुर्गंधी येऊ लागली आहे. दूषित पाणी घरे, दुकाने आणि सोसायट्यांच्या आवारात साचून राहिल्याने साथीच्या रोगांचा धोका वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, नालासोपारा आणि विरार स्थानकादरम्यान रेल्वे रुळांवर मंगळवारीही पाणी साचलेले असल्याने पश्चिम रेल्वेची उपनगरी वाहतूक सलग दुसऱ्या दिवशी विस्कळीत झाली. संध्याकाळी पुन्हा पावसाचे पाणी रुळावर साचल्याने ती बंद पडली. त्यामुळे कामावर जाणाऱ्या हजारो प्रवाशांचे मोठे हाल झाले. पालिकेची परिवहन सेवा ठप्प असून संपूर्ण शहरात मंगळवारी केवळ १६ बसेस रस्त्यावर धावत होत्या.

# नाशिकवरील ढगफुटीचे संकट टळले

पान १ वरून

४० मिमी पावसाची नोंद झाली आहे. इगतपुरीतील वसंत पवार नगरमध्ये काही घरांमध्ये पाणी शिरले. त्र्यंबकेश्वर-खोडाळा मार्ग बंद झाला असून, मातीचा भराव टाकलेला पूल वाहून गेल्याने ४० हून अधिक गावांचा संपर्क तुटला. मुंबई-नाशिक महामार्गावरील कसारा घाटात दरड कोसळल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. मुंबईत सकाळी ८.३० वाजेपर्यंत शहरात ५७ मिमी तर उपनगरात ९० मिमी पावसाची नोंद झाली. काल दिवसभर विस्कळीत झालेली पश्चिम रेल्वेची लोकल सेवा पुन्हा सुरू झाली. मात्र नालासोपारा-वसई रेल्वे मार्गावर पाणी साचल्याने लोकल १५ ते २० मिनिटे उशिराने धावत होत्या. मुंबई-पुणे वाहतूक सुरू होती पण विक्रोळी, टागोरनगर, कन्नमवारनगर परिसरात पाणी साचले. पालघर जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे तानसा नदीला पूर आला. अकलोली, वज्रेश्वरी, गणेशपुरी आणि उसगाव परिसरात पूरस्थिती निर्माण झाली. वसई, विरार, सफाळे, केळवे, बोईसर, मनोर आणि वाडा भागात पावसाचा जोर कायम होता. काही ठिकाणी वीजपुरवठा खंडीत झाला होता. डहाणूमध्ये सकाळी ८.३० वाजेपर्यंत ३९९ मिमी पावसाची नोंद झाली. सूर्या आणि वैतरणा नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. नवी मुंबईतील सानपाडा परिसरात झाड कोसळून दुचाकीवरून जाणारी महिला जखमी झाली. ठाण्यात पडणाऱ्या झाडांना सोसायटी जबाबदार असल्याचा अजब दावा ठाणे मनपा आयुक्त सौरभ राव यांनी केला. पुणे जिल्ह्यात वेल्हे येथील बार्शीमाळ परिसरात दरड कोसळल्याने पाबे घाट रस्ता बंद करण्यात आला. पावसाचा फटका पुणे मेट्रोलाही बसला असून, स्वारगेट मेट्रो स्थानकात पाणीगळती झाली. पुणे- पानशेत मार्गावरील वराडी पूल वाहून गेला. देहू-इंद्रायणी नदीकाठावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. वारकऱ्यांना नदीपात्रात जाण्यास मज्जाव करण्यात आला. जिल्ह्यातील सर्व २२ धरणांमध्ये पाणीसाठा वाढला असून, खडकवासला धरणातून विसर्ग सुरू करण्यात आला. रायगडमधील पोलादपूर तालुक्यात नाणेघोळ डोंगराला तडे गेल्याने ७० नागरिकांचे स्थलांतर करण्यात आले. महाडमध्ये पूरस्थिती कायम असून, सावित्री नदी धोक्याच्या पातळीवरून वाहत होती. रत्नागिरीत परशुराम घाटातील गॅबियन पुलाखालची माती वाहून गेली. तर शेलारवाडी येथे दरड कोसळली. पावसाचा जोर कमी झाला तरी वाऱ्याचा वेग मोठा होता. संगमेश्वर, दापोलीत जोरदार पाऊस झाला. जगबुडी नदी धोका पातळीवरून वाहत होती. मंत्री उदय सामंत यांनी पहाटे खेड तालुक्यातील दहिवली येथील भूस्खलनग्रस्त भागाची पाहणी करून परिसरातील कुटुंबांना स्थलांतरित करण्याचे आदेश दिले. कोल्हापूरमध्ये पंचगंगा नदीची पाणी पातळी ३५ फुटांवर पोहोचली. सांगली जिल्ह्यात चांदोली धरण परिसरात अतिवृष्टी झाली. सातारा जिल्ह्यातील कांदाटी खोऱ्यात मुसळधार पावसामुळे दरडी आणि झाडे कोसळून १६ गावांचा संपर्क तुटला. पोलादपूर-महाबळेश्वरला जोडणारा आंबेनळी घाट पुढील एक महिना वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्याला स्थानिकांनी विरोध केला आहे.

# लाडक्या बहिणींना रक्कम वाढवून देणार

पान १ वरून

अद्याप या रकमेत वाढ करण्यात आलेली नाही. पंतप्रधान आर्थिक सल्लागार परिषदेने देशातील १५ राज्यांमध्ये महिलांसाठी राबवल्या जाणाऱ्या आर्थिक सहाय्य योजनांचा अभ्यास केला. या अभ्यासातून देशातील सुमारे १२ कोटी महिला थेट रोख हस्तांतरण योजनांचा लाभ घेत असल्याचे उघड झाले आले.

महिलांना थेट आर्थिक मदत दिल्यामुळे त्यांचा आर्थिक सहभाग वाढतो. तसेच संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक नियोजनावर सकारात्मक परिणाम होतो, असे परिषदेने म्हटले आहे. परिषदेच्या अहवालात महाराष्ट्रातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' आणि ओदिशातील 'सुभद्रा योजना' यांचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. या योजनांमुळे लाभार्थी महिलांच्या बचतीत आणि कौटुंबिक खर्चात सातत्याने वाढ झाल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. महिलांना दैनंदिन गरजा भागवण्यासाठी तसेच शिक्षण, आरोग्य आणि जीवनमान सुधारण्यासाठी या आर्थिक मदतीचा उपयोग होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

अहवालात म्हटले आहे की, खर्चाच्या पद्धती लक्षात घेऊन वेळोवेळी आढावा घेणे आवश्यक आहे. सध्याची आर्थिक मदत पुरेशी आहे का, याचे मूल्यमापन करून त्यात आवश्यक बदल करणे गरजेचे आहे. लाडकी बहीण योजनेमुळे महाराष्ट्रातील लाभार्थी महिलांच्या बँक खात्यातील शिल्लक रकमेत ८४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच त्यांच्या मासिक खर्चातही ४६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. महिलांच्या हातात पैसा आल्यामुळे त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांवरील आर्थिक ताण कमी झाला असून, घरातील आर्थिक नियोजन अधिक सक्षम झाले आहे. महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांमध्ये शिक्षण, आरोग्य आणि जीवनशैलीशी संबंधित खर्चात वाढ झाली आहे. एटीएमच्या माध्यमातून होणाऱ्या खर्चाचे प्रमाण १८ टक्क्यांवरून २४ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. तसेच यूपीआय व्यवहारांमध्येही वाढ झाली असून, जीवनशैलीशी संबंधित खर्च ३७ टक्क्यांवरून ४२ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. वैद्यकीय खर्चातही ८ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

महिलांना थेट आर्थिक सहाय्य देणाऱ्या योजना या राज्यांच्या कल्याणकारी योजनांमधील महत्त्वाचा भाग बनल्या आहेत.

आर्थिक वर्ष २०२६ पर्यंत १५ पेक्षा अधिक राज्यांनी महिलांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा करणाऱ्या योजना सुरू केल्या असून, त्यासाठी सुमारे १.७ लाख कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. या योजनांचा लाभ जवळपास १२ कोटी महिलांपर्यंत पोहोचला आहे. थेट आर्थिक मदत मिळाल्यामुळे महिलांमध्ये डिजिटल व्यवहारांचे प्रमाण वाढले आहे. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होण्यास मदत होत असल्याचे परिषदेने म्हटले आहे.

शरद पवार गटाचे आ. रोहित पवार यांनी या शिफारशीची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. लाडकी बहीण योजनेतील आर्थिक मदत वाढवण्यासाठी सरकारने निर्णय घ्यावा, असे त्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवर काही अर्थतज्ज्ञांनी यापूर्वी आक्षेप घेतले असले तरी, पंतप्रधान आर्थिक सल्लागार परिषदेने या प्रकारच्या महिलांसाठीच्या थेट आर्थिक सहाय्य योजनांचे सकारात्मक परिणाम नमूद केले आहेत. पंतप्रधान आर्थिक सल्लागार परिषदेच्या या शिफारशीनंतर लाडकी बहीण योजनेतील सध्याची १,५०० रुपयांची मदत किती वाढणार, याकडे आता महिलांचे लक्ष लागले आहे.

## रक्षाबंधनानिमित्त दिल्लीत महिलांना दरमहा २,५०० रुपये

पान १ वरून

संकल्प पत्रात दिलेल्या आश्वासनानुसार 'महिला समृद्धी योजना' राबविण्याची तयारी दिल्ली सरकारने सुरु केली आहे. त्यासाठी ऑनलाईन नोंदणी पोर्टल आणि पात्रतेचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. २०२६-२७ च्या दिल्ली सरकारच्या अर्थसंकल्पात यासाठी ५,११० कोटी रुपयांची तरतूद केली असून, २० ते २२ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी योजना पूर्ण तयारीनिशी राबवली जाणार असल्याचे स्पष्ट केले.

या योजनेचा लाभ २१ ते ६० वर्षे वयोगटातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना मिळणार आहे. लाभार्थी महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० ते ३ लाख रुपयांपर्यंत असावे. अर्जदार महिला दिल्लीची कायमस्वरूपी रहिवासी असणे आवश्यक असून, रेशन कार्डधारक महिलांना प्राधान्य दिले जाणार आहे. सरकारी नोकरी करणाऱ्या महिला, आयकर भरणाऱ्या महिला, सरकारी पेन्शनधारक महिला आणि चारचाकी वाहनाच्या मालकीच्या महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. अर्ज पूर्णपणे ऑनलाईन करावा लागणार आहे. अर्ज करताना आधार क्रमांक, नाव, जन्मतारीख, वडील किंवा आईचे नाव, वैवाहिक स्थिती, मोबाईल क्रमांक, ई-मेल, दिल्लीतील वास्तव्यासंबंधी माहिती, आधारशी संलग्न बँक खात्याचा तपशील आणि स्वघोषणापत्र सादर करावे लागणार आहे.

# सिया-चेतनचा ४ महिन्यांपूर्वीच गुप्त विवाह

पान १ वरून- दोन महाविद्यालयीन मित्र-मैत्रिणींचीही चौकशी सुरू आहे. पोलिसांचे तांत्रिक पथक दोघांच्या खासगी इन्स्टाग्राम खात्यातून हटवलेली छायाचित्रे पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. या छायाचित्रांमध्ये दोघांनी विवाहातील हार परिधान केल्याचे छायाचित्र असल्याचा संशय आहे. व्हॉट्सअ‍ॅप चॅटमध्ये केतन अगरवाल मार्गातून दूर करण्याबाबत दोघांमध्ये चर्चा झाल्याचाही दावा पोलिसांनी केला आहे. माझी हिंमत होत नाही, तुही सोबत चल. आपण दोघे त्याला दरीत ढकलून देऊ असे संदेश तपासात मिळाले आहेत. या संदेशांची फॉरेन्सिक पडताळणी सुरू आहे.

**NOTICE**

Exh. No. 31
Next Date-16/07/2026

**IN THE COURT OF SHRI V. B. PATHAK JUDGE, COURT NO 4, FAMILY COURT, MUMBAI AT BANDRA. PETITION NO. A-74 OF 2021**

Mr. Hussain Shaikh ...Petitioner.
Vs.
Mrs. Simran Shaikh
Add: (Nisar House) 666, Transit Camp, Municipal Chawl No.13 Room No. 4, Hains Road, B.J. Marg, Byculla, Mumbai ...Respondent.

TAKE NOTICE THAT the petitioner above named has filed petition against you for Restitution of Conjugal Rights U/Sec. 281 Of Mohammedan Law.

TAKE FURTHER NOTICE THAT the petition is fixed for on 16th day of July, 2026 at 10.30 a. m. sharp in Family Court No. 4, at Bandra, Mumbai or before any other Hon'ble Judge, presiding in the Family Court, Mumbai at Bandra, assigned charge of the said Court No. 4 when you are required to appear in person and file your Written Statement and default of your doing so, the Hon'ble Judge, Family Court will proceed to hear the said petition, against you Ex-parte and pronounce Judgment there on.

THIS NOTICE IS ORDERED by Hon'ble Judge, presiding in Court No. 4, on 05th day of March, 2026 Order on Below Exh.29

**Given under my hand and Seal of this Court, Dated this 29th day of May, 2026.**

Seal
Sd/-
Dy. Registrar,
Family Court, Bandra (East)

**सार्वजनिक नोटीस**

याद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, Zenith CHS सोसायटी, शॉप नंबर २२, मरोळ भवानी नगर येथे राहणाऱ्या, आमच्या सह-मालक श्रीमती शीमा पांडुरंग श्रीमंगले यांचे निधन झाले आहे. त्या मालमत्तेतील त्यांचा ५० टक्के हिस्सा आता त्यांचे पती, श्री. पांडुरंग श्रीमंगले, यांच्या नावावर हस्तांतरित करण्यात येत आहे. या मालमत्तेवर कोणाचाही हक्क, आक्षेप किंवा दावा असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात खाली स्वाक्षरी करणाऱ्यांना कळवावे, अन्यथा हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

**जाहीर सूचना**

आम्ही **पुर्वांकरा लिमिटेड.** सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने सी.टी.एस. क्र. ६ आणि ७/६१७, यावरील मियामी अपार्टमेंट, मलबार हिल विभाग स्थित डी वॉर्ड, मुंबई, महाराष्ट्र येथिल पुनर्विकास प्रकल्पाला दिनांक ३ जुलै २०२६ रोजी पत्र क्रमांक EC26C3801MH5159251N. अन्वेय पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून मान्यता दिली आहे. सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या http://parivesh. nic.in/ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**पुर्वांकरा लिमिटेड.**

# 'मायक्रोसॉफ्ट' ४,८०० कर्मचाऱ्यांची कपात करणार




**वॉशिंग्टन -** संगणक क्षेत्रातील जगातील दिग्गज कंपनी मायक्रोसॉफ्टने जगभरातील आपल्या कर्मचाऱ्यांपैकी ४८०० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याची योजना सुरू केली आहे. एकूण कर्मचारी संख्येच्या २.१ टक्के कपात करण्याची मायक्रोसॉफ्टची ही योजना आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या (एआय) प्रवेशानंतर मायक्रोसॉफ्टने एआयमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याला अनुसरून कंपनीने कामगार कपातीचे धोरण स्वीकारले आहे. याचा सर्वाधिक फटका कंपनीच्या गेमिंग विभागाला बसणार आहे. गेमिंग विभागातील ३,२०० कर्मचाऱ्यांना घरी बसवण्यात येणार आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# मोक्षाच्या शोधात...

**मी माझ्या आजारी वडिलांना काशीतील मुक्ती भवनात घेऊन चाललो होतो या अपेक्षेने की, ते तिथे लवकरच निधन पावतील. माझी तिथे जाण्याची इच्छा होती म्हणून नव्हे. पण वडिलांचे सततचे आजारपण, त्यांची दुर्बलता आणि औषधं व उपचारांवरील न संपणारा खर्च यामुळे मी पूर्णपणे खचून गेलो होतो. त्यांच्या देखभालीवर मी आधीच खूप खर्च केला होता आणि आता असंच पुढे चालू ठेवणं मला शक्य नाही असं मला वाटू लागलं होतं.**

**रामदास पाटील खानिवलीकर**

**तेव्हाच** एका जवळच्या मित्राने मला काशीतील मुक्ती भवनाबद्दल सांगितलं. तो म्हणाला की, हिंदू श्रद्धेनुसार, काशीत मृत्यू आल्यास मोक्ष मिळतो, आणि मुक्ती भवन ही अशा सर्वात प्रसिद्ध जागांपैकी एक आहे जिथे लोक त्यांचे शेवटचे दिवस घालवतात. तू तुझ्या वडिलांना तिथे नेलंस, तर तुला शांती मिळेल आणि तुझ्या वडिलांना मोक्ष मिळेल.

आणि म्हणून, एके दिवशी मी वडिलांना घेऊन रेल्वेत बसलो. माझे वडील खिडकीजवळ बसून बाहेर पाहत होते. त्यांच्या चेहऱ्यावर थकव्याची चिन्हे होती, पण डोळे शांत होते.

आपण कुठे चाललो आहोत, बाळा? त्यांनी विचारलं.

काशीला.

काशीला? अरे, माझ्या महादेवा! ही यात्रा करायची इच्छा मला कित्येक वर्षांपासून होती. त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेला आनंद माझ्या हृदयाला भिडला. पण मी त्याकडे दुर्लक्ष केलं.

संपूर्ण प्रवासात माझे वडील भूतकाळाबद्दल बोलत राहिले. लहानपणी मला ताप आला होता तेव्हा ते रुग्णालयात माझ्यासोबत कसे थांबले होते. माझी शाळेची फी भरण्यासाठी माझ्या आईने तिच्या बांगड्या कशा विकल्या होत्या. मला हवी असलेली सायकल घेण्यासाठी ते रात्री उशिरापर्यंत ऑटो-रिक्षा कसे चालवायचे. मी ऐकत होतो, पण माझ्याकडे बोलायला फार काही नव्हतं. खूप लांबच्या प्रवासानंतर आम्ही वाराणसीला पोहोचलो आणि मुक्ती भवनात आलो.

मला भयाण शांतता अपेक्षित होती, मृत्यूची शांतता. पण मी जे पाहिलं ते वेगळंच होतं. लहान खोल्या. पांढऱ्या भिंती. जुने छताचे पंखे हळूहळू फिरत होते. मृत्यूची वाट पाहणाऱ्यांसाठी प्रार्थना म्हणत साधू कॉरिडॉरमधून फिरत होते. मी वडिलांना आम्हाला दिलेल्या खोलीत नेलं.

मी खूप थकलोय, बाळा. मला जरा पडू दे. मी मान हलवली. ते झोपलेले पाहताच, मी टेबलावरून माझी बॅग उचलली आणि बाहेर पडलो. मागे न पाहता घाईघाईने निघालो असताना, एका खोलीचा दरवाजा थोडा उघडा दिसला आणि मी आत डोकावलं. एक वृद्ध गृहस्थ खिडकीजवळ बसून बाहेर पाहत होते. त्यांच्या हातात एक जुना फोटो होता-कदाचित त्यांच्या पत्नीचा किंवा मुलाचा. अधूनमधून ते फोटोकडे पाहून हसत होते.

दुसऱ्या खोलीत, एक वृद्ध स्त्री डोळे मिटून हातात माळ घेऊन प्रार्थना करत बसली होती. तिच्या शेजारी कोणीही नव्हतं. पण ती एकटी नव्हती. तिच्या आठवणी तिच्यासोबत होत्या.



कॉरिडॉरच्या शेवटी, एक वृद्ध वडील बिछान्यावर पडले होते. त्यांच्या शेजारी एक तरुण त्यांचा हात धरून बसला होता. बाबा, मी इथेच आहे, तो सारखं म्हणत होता. घाबरू नका. त्या वृद्धाला ते ऐकू येत होतं की, नाही माहीत नाही. पण मुलाच्या आवाजात प्रेम होतं. तिथे प्रत्येकजण मृत्यूची वाट पाहत होता. तरीही मला वाटलं की, त्यांच्यापैकी बरेचजण दुसऱ्याच कशाची तरी वाट पाहत आहेत.

एक फोन कॉल.

एक भेट.

मुलाचे दिलासा देणारे शब्द.

मुलीची बाबा अशी हाक.

त्याचीच ते खरं तर वाट पाहत होते. तिथल्या एका कर्मचाऱ्याने मला पाहिलं आणि म्हणाला:

इथे येणारे बहुतेक लोक मृत्यूला घाबरत नाहीत, साहेब. त्यांना जास्त दुःख होतं ते या विचाराने की, त्यांचे प्रियजन त्यांना विसरले आहेत. ते म्हणतात इथे मृत्यू आल्याने मोक्ष मिळतो, पण आपल्या मुलांमध्ये शांतपणे मरणं आणि इथे एकटं मरणं यात खूप मोठा फरक आहे.

तो पुढे म्हणाला:

इथे येणारे बरेच लोक लवकर मरतात, आजारीपणामुळे नाही, तर त्यांची मुलं त्यांना सोडून गेली आहेत हे कळल्यावर त्यांचं हृदय फाटतं म्हणून.

त्या शब्दांनी मला हादरवून सोडलं.

मी आजूबाजूला पाहिलं. काही डोळे दाराकडे रोखलेले होते. कोणीतरी येण्याची वाट पाहत. काही डोळे आकाशाकडे वळलेले होते. कोणीतरी फोन करेल याची वाट पाहत. आणि काही डोळ्यांत तर आशाच उरली नव्हती. फक्त वाट पाहणं.

अचानक मला माझ्या वडिलांची आठवण झाली. मी मागे वळलो आणि धावलो. जेव्हा मी खोलीत शिरलो, तेव्हा माझे वडील बिछान्यावर उठून बसले होते, घामाने न्हाऊन निघाले होते, अशक्त दिसत होते.

तेही उघड्या दाराकडे पाहत होते. मला पाहताच त्यांनी सुटकेचा श्वास सोडला. आणि मी विचार केला:

जर मी आता निघून गेलो, तर उद्या माझे वडील त्या दाराशी वाट पाहणारा आणखी एक चेहरा बनणार नाहीत का? त्या क्षणी, मुक्ती भवन मला फक्त एक इमारत वाटली नाही. ते एक शांत जग वाटलं जिथे आयुष्यभर इतरांची काळजी घेणारी माणसं प्रेमाच्या एका शेवटच्या स्पर्शाची वाट पाहत होती.

मी या विचारांत हरवलो असताना, मला वडिलांची हाक ऐकू आली.

बाळा...

हो, बाबा?

तू गेला नाहीस?

मी कुठे जाईन?

मला माहीत आहे तू मला इथे सोडायला आणलंस.

ते थांबले. पण मी तुला दोष देत नाही. आई-वडील म्हातारे झाले की, ते कधी कधी मुलांसाठी ओझं होतात. कदाचित मीही तुझ्यासाठी ओझं झालो असेन. मग त्यांनी माझा हात घट्ट धरला. पण एक गोष्ट लक्षात ठेव, बाळा...

आई-वडिलांसाठी सर्वात मोठा मोक्ष काशीत मरणं हा नाही. तो मुलांच्या हृदयातून काढून टाकलं न जाणं हा आहे. कृपा करून माझा तिरस्कार करू नकोस, बाळा. मी गेल्यावर माझे विधी कर. त्या शब्दांनी माझं हृदय विदीर्ण झालं. इथे जास्त वेळ थांबू नकोस, बाळा. जा. पण जाण्यापूर्वी तुझ्या वडिलांना एक मिठी मार आणि एक पापी दे. मला तुला पुन्हा एकदा जवळ घ्यावंसं वाटतंय.

त्यांची शेवटची इच्छा.

बाबा...

मी ढसाढसा रडलो.

वर्षानुवर्षांचा स्वार्थ आणि हिशेब माझ्या अश्रूंमध्ये विरघळून गेले. त्या रात्री, मी मुक्ती भवनातील खोलीत वडिलांजवळ झोपलो. झोपलेल्या त्यांच्या चेहऱ्यावरील सुरकुत्या पाहताना मला एक सत्य कळलं. माझ्या आयुष्यातील सर्वात सुरक्षित जागा कधीतरी या माणसाचा खांदा होती.

मी घाबरलो तेव्हा त्यांनीच मला धरलं होतं. मी पडलो तेव्हा त्यांनीच मला उचललं होतं. मी अपयशी ठरलो तेव्हा ते माझ्या पाठीशी उभे राहिले होते. मग मी त्यांना त्यांच्या शेवटच्या वर्षांत कसं सोडून देऊ शकतो?

दुसऱ्या दिवशी सकाळी, मी घरी परतण्याची तिकिटं बुक केली. आम्ही निघायची तयारी करत असताना, मुक्ती भवनातील कर्मचाऱ्यांनी माझ्या वडिलांच्या शांत मृत्यूसाठी प्रार्थना करण्यासाठी साधूंना बोलावलं.

मी त्यांना थांबवलं.

आता त्याची गरज नाही, मी म्हणालो. माझ्या वडिलांना मोक्ष मिळालेला नाही. मोक्ष मला मिळाला आहे. माझ्या वडिलांनी माझ्याकडे आश्चर्याने पाहिलं.

तुला काय म्हणायचंय, बाळा?

मी त्यांचा हात धरला. चला बाबा, घरी जाऊया. पण आधी, गंगेत डुबकी मारून प्रभूचं दर्शन घेऊ. मग, मला इथे राहावं लागणार नाही? त्यांनी विचारलं. का राहावं लागेल? ज्याला मुक्तीची गरज होती ते तुम्ही नव्हता. माझं मन होतं, ते मन जे स्वतःच्या वडिलांना ओझं समजलं होतं.

माझ्या वडिलांच्या डोळ्यांत अश्रू भरून आले. त्या क्षणी, काशीच्या मंदिरातील घंटानादापेक्षा अधिक पवित्र होता त्या वृद्धाच्या चेहऱ्यावरून ओघळणारा तो मूक अश्रू.

सर्व मुलांना आणि सर्व आईवडिलांना समर्पित.

**(मल्याळी कथेचा स्वैर अनुवाद)**

# सरकारने हाफकीनचे पैसे द्यावे
## आमदारांची अधिवेशनात मागणी

■ मुंबई

**'दो बूँद** जिंदगी के' म्हणून पोलिओ लस उत्पादन करणाऱ्या हाफकिन महामंडळाला २६५ कोटींची ऑर्डर मिळाली असून, उत्पादन चालू आहे. परंतु लसींचा पुरवठा केल्यानंतर मिळणारे पैसे हे केंद्र शासनाकडून ७५ कोटी आणि राज्य शासनाकडून १० कोटी येणे बाकी असल्याने हाफकिन महामंडळाची परिस्थिती बिकट होत चालली आहे. २६५ कोटी रुपयांची पोलिओ लसीची ऑर्डर पूर्ण करण्यासाठी सर्वप्रथम शासनाने ५० कोटी रुपयांचे खेळते भांडवल द्यावे, अशी मागणी आमदार संजय खोडके यांनी आज विधान परिषदेमध्ये केली.

आमदार भाई जगताप यांनी १३५ वर्षांचे हाफकिन महामंडळ हे बावनकशी सोन्यासारखे असताना त्याचे joint ventures च्या नावाखाली रिलायन्सला विकून लोकांच्या जीवाशी खेळण्याचा प्रयत्न का करता? असा प्रश्न मांडला.

आमदार प्रसाद लाड यांनी हाफकिन महामंडळाला पूर्ण वेळ अधिकारी द्यावा.



तसेच त्रिगुणी लसीचे उत्पादन करण्यापूर्वी कालबद्ध नियोजन करावे, असा मुद्दा उपस्थित केला. मंत्री श्री नरहरी झिरवाळ यांनी हाफकिन फार वाईट अवस्थेत असलेली टिप्पणी ही चुकीची आहे.

मुख्यमंत्री यांच्याबरोबर बैठक आयोजित करून हाफकिन मंडळाचा प्रश्न सोडविण्यात येईल, असे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले.

# ठाकरे गटाच्या बैठकीला पुन्हा
## आमदार राहुल पाटलांची दांडी

■ मुंबई

**मातोश्री** बंगल्यावर ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज बोलावलेल्या आमदारांच्या बैठकीला परभणीचे आमदार राहुल पाटील यांनी पुन्हा दांडी मारली. घरी कार्यक्रम असल्यामुळे या बैठकीला आलो नाही, असे त्यांनी उद्धव ठाकरे यांना फोनवरून कळवले. या बैठकीला विधानसभेचे १९ आमदार आणि विधान परिषदेचे ५ आमदार उपस्थित होते.

याआधीही शिवालयावर ठाकरे गटाच्या ६ खासदारांच्या फुटीनंतर आमदारांची बैठक घेण्यात आली होती. त्यात ४ आमदार गैरहजर राहिले होते. त्यात राहुल पाटील यांचा समावेश होता. आजच्या बैठकीला ते हजर न राहिल्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

# नीरव मोदीच्या भारतात
## प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा

■ लंडन

**पंजाब** नॅशनल बँक (पीएनबी) घोटाळ्यातील मुख्य आरोपी फरार हिरे व्यापारी नीरव मोदी याच्या भारतात प्रत्यार्पण करण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. कारण नीरव मोदीला युरोपियन कोर्ट ऑफ ह्युमन राईट्सनेही दिलासा देण्यास नकार दिला आहे. सुमारे १४ हजार कोटी रुपयांच्या पीएनबी घोटाळ्याप्रकरणी नीरव मोदी याला २०१९ मध्ये लंडनमध्ये अटक करण्यात आली. तेव्हापासून तो लंडनमधील एचएमपी वँड्सवर्थ कारागृहात बंद आहे. २०२१ मध्ये ब्रिटनच्या तत्कालीन गृहमंत्री प्रिती पटेल यांनी त्याच्या प्रत्यार्पणाला मंजुरी दिली होती. मात्र नीरव मोदी प्रत्यार्पण टाळण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत होता. अखेरचा पर्याय म्हणून त्याने युरोपियन कोर्ट ऑफ ह्युमन राईट्समध्ये धाव घेतली होती.

# वर्ध्यातील गोरस भांडार कारवाई बेकायदेशीर
## तुकाराम मुंढेंना मुंबई हायकोर्टाचा दणका

■ नागपूर

**वर्ध्यातील** प्रसिद्ध गोरस भांडारवरील अन्न व औषध प्रशासन विभागाची कारवाई मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बेकायदेशीर ठरवली. एफडीएने निलंबित केलेला गोरस भांडारचा परवाना तत्काळ बहाल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कारवाईला धक्का बसला आहे. या निर्णयामुळे गोरस भांडारला दिलासा मिळाला असून, संस्थेने न्यायालयाच्या निकालाचे स्वागत केले आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाने ३१ मे रोजी गोरस



भांडारवर धाड टाकली होती. उत्पादन प्रक्रियेत अस्वच्छता असल्याचा ठपका ठेवत एफडीएने संस्थेचा परवाना निलंबित केला होता. या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात दुग्धजन्य पदार्थ जप्त केले होते. त्यापैकी सुमारे ९ लाख रुपयांचे उत्पादन फेकून द्यावे लागल्याचा दावा गोरस भांडारने केला. एफडीएच्या कारवाईविरोधात गोरस भांडार संस्थेने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली होती. जप्त केलेल्या खाद्यपदार्थांचे तपासणी अहवाल येण्यापूर्वीच परवाना निलंबित केल्याचा आरोप संस्थेने याचिकेतून केला होता.

# मणिपूरमध्ये बंडखोरांच्या हल्ल्यात
## आसाम रायफल्सचे २ जवान शहीद

■ इंफाळ

**मणिपूरच्या** उखरूल जिल्ह्यात काल संशयित बंडखोरांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात आसाम रायफल्सचे दोन जवान शहीद झाले, तर अनेक जवान जखमी झाले. नुंगशांग खोंग परिसरात दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेनंतर या भागात तणाव पसरला आहे.

दबा धरून बसलेल्या बंडखोरांनी ४० व्या आसाम रायफल्स या निमलष्करी दलाच्या ताफ्यावर अचानक हल्ला चढवत बेछूट गोळीबार केला, असे आसाम रायफल बटालियन सांगशाक येथील मुख्यालयाकडून सांगण्यात आले. मृत्युमुखी पडलेल्या दोन जवानांपैकी एक वॉरंट ऑफिसर तर एक लष्करी गाडीचा चालक होता. या दोघांचाही जागीच मृत्यू झाला. जिल्हा मुख्यालयापासून सुमारे १७ किलोमीटर अंतरावर ही घटना घडली. हे जवान मुख्यालयात हजेरी लावून परतत होते. त्यांना वाटेत गाठून बंडखोरांनी हा हल्ला केला.

या हल्ल्यानंतर परिसरात लष्कराची तैनाती वाढवण्यात आली आहे. घटनेनंतर थोड्याच वेळात काही मीटरच्या अंतरावर पुन्हा लष्करी जवान आणि बंडखोरांमध्ये चकमक झडली. मात्र या चकमकीत जीवितहानी झाली नाही.

# आंदोलन मोठे होऊ नये म्हणून ढगफुटी!
## सपकाळांच्या आरोपांवर महाजनांचा टोला

■ नाशिक

**अयोध्येतील** राम मंदिरातील देणगी गैरव्यवहाराच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. काँग्रेसने या प्रकरणाच्या चौकशीच्या मागणीसाठी राज्यभर 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रह आंदोलन सुरू केले. या आंदोलनाची आजपासून नाशिकच्या ऐतिहासिक काळाराम मंदिरातून झाली. या आंदोलनानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप करत म्हटले की, आमचे



आंदोलन मोठे होऊ नये म्हणून ढगफुटीची अफवा पसरवली. आंदोलन भरकटवण्याचा प्रयत्न केला. या हास्यास्पद आरोपांवर मंत्री गिरीश महाजन यांनी टोला लगावत म्हटले की, होय, आम्हीच ढगफुटी केली. आम्हीच पाणी वर पाठवले आणि आम्हीच खाली आणले. त्यांच्या डोक्याची कीव येते. राज्यातील जनता अतिवृष्टीमुळे मोठ्या संकटाचा सामना करत आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. अशा गंभीर परिस्थितीत अशा प्रकारची बेजबाबदार वक्तव्ये करणे योग्य नाही. आपण काय बोलतो, याचे भान ठेवायला पाहिजे. इतक्या कमी कालावधीत राज्यात विक्रमी पाऊस झाला आहे.

# मृत्यूवर कोणीही हसू शकत नाही
## साटम यांचे विधानसभेत स्पष्टीकरण

■ मुंबई

**मुंबईतील** पावसाळी दुर्घटनांवरून सुरू झालेल्या राजकीय वादाच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे मुंबई अध्यक्ष आणि आमदार अमित साटम यांनी विधानसभेत स्पष्टीकरण दिले. मुंबईतील मॅनहोल आणि झाड कोसळण्याच्या घटनांमध्ये झालेल्या नागरिकांच्या मृत्यूवर हसल्याने विरोधकांनी साटम यांच्यावर असंवेदनशीलतेचा आरोप केला होता. मात्र, मृत्यूवर कोणीही हसू शकत नाही. मी त्या घटनेवर हसलो नव्हतो, असा खुलासा करत साटम यांनी आरोप पुन्हा एकदा फेटाळले.

विधानसभेत बोलताना साटम यांनी दावा केला की, विधान भवनाच्या पायऱ्यांच्या समोर कॅमेरे लावलेले आहेत आणि ते कॅमेरे लाईव्ह आहेत. गेल्या आठवड्यामध्ये त्या ठिकाणी माध्यमांशी बोलत असताना शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील हे त्या ठिकाणी आले आणि त्यांनी मिश्कीलपणे कुठल्यातरी वेगळ्या विषयावरती माझ्याशी चर्चा केली. ती चर्चा करत असताना मी त्यांच्याशी गमतीने काही बोललो आणि ते तिथून निघून गेले. घटनेचा संदर्भ बदलून तेवढीच क्लिप काढली. एका वाहिनीने ती क्लिप टीव्हीवर चालवली आणि मी मृत्यूंवर हसत असल्याचे चित्र निर्माण केले.

# अमरनाथ यात्रेच्या प्रवाशांसाठी
## वंदे भारतमध्ये 'कोरास' कमांडो

■ श्रीनगर

**२८ ऑगस्टपर्यंत** चालणाऱ्या प्रसिद्ध अमरनाथ यात्रेदरम्यान जम्मू-श्रीनगर वंदे भारत एक्स्प्रेसमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सशस्त्र कमांडो तैनात करण्यात आले आहेत. रेल्वे सुरक्षा दलाच्या 'कोरास'चे २१ कमांडो प्रवाशांसाठी कडक पहारा देत आहेत. याबाबत व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.



हे कमांडो काळ्या रंगाचे कपडे, बुलेट-प्रूफ जॅकेट, हेल्मेट आणि आधुनिक शस्त्रांनी सज्ज असल्याने त्यांना सोशल मीडियावर 'ब्लॅक कमांडो' म्हटले जात आहे. कोरास कमांडोंना नॅशनल सिक्युरिटी गार्ड अकादमी आणि ग्रेहाउंड्स यांसारख्या अत्यंत संस्थांमध्ये विशेष प्रशिक्षण दिले जाते. हे कमांडो दहशतवादी हल्ले, बॉम्ब निकामी करणे आणि ट्रेन हायजॅक किंवा ओलीस ठेवण्याच्या संकटांना तोंड देण्यासाठी २४ तास तत्पर असतात. ही विशेष तुकडी २०१४ मध्ये तयार करण्यात आली. त्यांचा पहिला वापर नक्षल प्रभावित भागांत सुरक्षा आणि रेल्वेच्या महत्त्वाच्या बांधकामांच्या रक्षणासाठी करण्यात आला होता.

# डोंबिवलीत डॉक्टरांना मारहाण
## कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

■ डोंबिवली

**कल्याण-डोंबिवली** महापालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात शिंदेसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांना शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला. या घटनेच्या निषेधार्थ आज शास्त्रीनगरसह महापालिकेच्या सर्व रुग्णालयांतील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन केले. नगरसेवकावर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी करत अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व वैद्यकीय सेवा बंद ठेवल्या. पालिका रुग्णालयांतील सेवा विस्कळीत झाल्याने उपचारासाठी आलेल्या रुग्णांना मनस्ताप सहन करावा लागला. सीसीटीव्ही चित्रणात हा प्रसंग दिसत आहे. मारहाणीत एका स्त्रीरोगतज्ज्ञ महिला डॉक्टर, एक डॉक्टर आणि दोन परिचारिका जखमी झाल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. या घटनेच्या निषेधार्थ शास्त्रीनगर रुग्णालयासह कल्याणमधील रुक्मिणीबाई रुग्णालय आणि महापालिकेच्या इतर नागरी आरोग्य केंद्रांतील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती बांधून आंदोलन सुरू केले.

# एनएसईचा देशातील सर्वात मोठा
## आयपीओ सप्टेंबरमध्ये खुला होणार

■ नवी दिल्ली

**राष्ट्रीय** शेअर बाजाराचा (एनएसई) बहुप्रतीक्षित आयपीओ (प्रारंभिक सर्वसाधारण समभाग विक्री) येत्या सप्टेंबर महिन्यात गुंतवणूकदारांसाठी खुला होण्याची शक्यता आहे. ३० हजार कोटी रुपयांचा हा आयपीओ देशातील आजवरचा सर्वात मोठा आयपीओ ठरणार आहे.

एनएसई हा देशातील सर्वात मोठा शेअर बाजार आहे. या आयपीओमुळे एनएसईचे बाजार मूल्य ५ लाख कोटी




रुपयांच्या वर जाणे अपेक्षित आहे. हा आयपीओ यशस्वी ठरल्यास ऑक्टोबर २०२४ मध्ये आलेल्या हुंडाई मोटर इंडियाच्या २७,८७० कोटी रुपयांच्या आयपीओचा विक्रम मोडित निघणार आहे.

एनएसईच्या या आयपीओच्या घोषणेनंतर लगेचच रिलायन्स इंडस्ट्रीज पुरस्कृत जिओ प्लॅटफॉर्म्सनेदेखील जूनमध्ये शेअर बाजार नियामक संस्था 'सेबी'कडे मसुदा दस्तावेज सादर केले आहेत. जिओ प्लॅटफॉर्म्सचा तो आयपीओ एनएसईच्या आयपीओहून मोठा असणार आहे.